
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १५०
www.ramprahar.com

सोमवार, १६ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## जगप्रसिद्ध तबलावादक झाकीर हुसेन यांचे निधन



**न्यूयॉर्क :** जगप्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाल्याचे वृत्त रविवारी (दि. १५) रात्री प्रसारित झाले. त्यांच्यावर अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. ७३ वर्षीय झाकीरभाईंना दीर्घ काळापासून रक्तदाबाशी संबंधित समस्या होती. केंद्र सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण देऊन गौरविले आहे. याशिवाय १९९९मध्ये त्यांना यूएस नॅशनल एन्डॉवमेंट फॉर द आर्ट्सद्वारे राष्ट्रीय वारसा फेलोशिप प्रदान करण्यात आली. त्यानंतर त्यांना भारतीय शास्त्रीय संगीताचे जागतिक राजदूत म्हणून मान्यता मिळाली. उस्ताद झाकीर हुसेन हे पहिले भारतीय संगीतकार आहेत, ज्यांना अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी व्हाईट हाऊसमध्ये जागतिक मैफिलीसाठी आमंत्रित केले होते.

अंतरंग

‘अडीच वर्षांच्या मंत्रिपदातून अनेकांना सामावून घेऊ’/२
ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणाला गती/६
डब्ल्यूपीएल लिलावात भारतीय खेळाडूंचे वर्चस्व!/८

# महायुती सरकारचा विस्तार

## ३९ जणांना मंत्रीपद; ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या स्थापनेनंतर राज्यातील जनतेला ज्याची प्रतीक्षा होती तो मंत्रीमंडळ विस्तार रविवारी (दि. १५) उपराजधानी नागपूर येथे झाला. महायुतीच्या ३९ नेत्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली.

१९९१नंतर प्रथमच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी झाला. समारंभास केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांची उपस्थिती होती. या वेळी भाजपचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. भाजपच्या तीन, शिवसेनेच्या दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नेत्याला राज्यमंत्रिपदाची शपथ देण्यात आली आहे.

दरम्यान, महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात प्रादेशिक आणि जातीय संतुलनावर भर देण्यात आला आहे. या सोहळ्यास खासदार, आमदार व विविध क्षेत्रातील निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

### चार महिलांना संधी

महायुती सरकार सत्तेवर येण्यात लाडकी बहीण योजना महत्त्वपूर्ण ठरली. त्यानुसार चार महिलांना मंत्रिपदाची संधी मिळाली. यामध्ये भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांनी दुसऱ्यांदा मंत्रिपदाची शपथ घेतली, तर भाजप आमदार माधुरी मिसाळ आणि मेघना बोर्डीकर यांना राज्यमंत्रिपदी संधी देण्यात आली आहे.

**कॅबिनेट मंत्री :** चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे-पाटील, हसन मुश्रीफ, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, गणेश नाईक, दादा भुसे, संजय राठोड, धनंजय मुंडे, मंगलप्रभात लोढा, उदय सामंत, जयकुमार रावळ, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक उईके, शंभूराज देसाई, आशिष शेलार, दत्ता भरणे, आदिती तटकरे, शिवेंद्रसिंह भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवळ, संजय सावकारे, संजय शिरसाठ, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर.

**राज्यमंत्री :** माधुरी मिसाळ, आशिष जयस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर-साकोरे, इंद्रनील नाईक, योगेश कदम.



*नवी मुंबईतील भाजपचे नेते आमदार गणेश नाईक यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. यापूर्वी त्यांनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भूषविलेले आहे.*



*रायगड जिल्ह्यातील महाड मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडून आलेले शिवसेनेचे आमदार भरत गोगावले पहिल्यांदाच मंत्री झाले आहेत.*



*रायगडच्या श्रीवर्धन मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजय मिळवणाऱ्या राष्ट्रवादीच्या आमदार आदिती तटकरे पुन्हा मंत्री झाल्या आहेत.*

# विजय आमच्या डोक्यात जाणार नाही, जनतेसाठी काम करू -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

नव्या मंत्र्यांच्या शपथविधीसाठी, मंत्रिमंडळ विस्तारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी (दि. १५) नागपुरात दाखल झाले. त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर ते भाजपच्या विजयी रॅलीत सहभागी झाले. या वेळी त्यांनी संबोधित करताना हा विजय कधीही आमच्या डोक्यात जाणार नाही. राज्यातील जनतेसाठी काम करू, अशी ग्वाही दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नुकत्याच झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत आपल्या महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आहे. सर्व समाजांनी आपल्याला मोठ्या प्रमाणात मदत केली. खऱ्या अर्थाने लाडक्या बहिणींनी, शेतकऱ्यांनी, युवकांनी व राज्यातील गोरगरीब जनतेने आपल्याला मदत केली. मराठा, धनगर, आदिवासी व अनुसूचित जातींमधील लोकांनी आपल्यावर विश्वास दाखवला आहे. आपला हा विजय या सर्व मंडळींचा विजय आहे. मला आज या व्यासपीठावरून सर्वांना एकच गोष्ट सांगायची आहे की, हा विजय कधीही आमच्या डोक्यात जाणार नाही. सत्ता मिळाली म्हणून आमचे पाय हवेत जाणार नाहीत. आम्हाला केवळ लोकांच्या सेवेसाठी ही सत्ता मिळाली आहे. ती आम्हाला कायम जमिनीवर ठेवेल.

राज्य बदलण्यासाठी, लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी, आपल्याला लोकांनी बहुमत दिले आहे. त्यामुळे आम्ही लोकांसाठी काम करू. माझे सहकारी एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह संपूर्ण टीम महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. आमचे हे सरकार दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस तुमच्यासाठी काम करेल. तुम्ही आमच्यावर विश्वास दाखवलात, त्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे आभार मानतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

### नागपुरात जंगी स्वागत; विजयी रॅली





## निवडक

### ‘फेंगल’मुळे पुदुच्चेरीत धुवांधार पाऊस; जनजीवन विस्कळीत

**पुदुच्चेरी, चेन्नई :** फेंगल चक्रीवादळामुळे शनिवारी सायंकाळपासून देशाच्या दक्षिणेतील अनेक भागांत पाऊस झाला असून पुदुच्चेरीत जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते, वसाहती जलमय झाल्याने अनेक भागातील लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. तामिळनाडूतही अनेक भागांत पाऊस पडला. त्यामुळे चेन्नईत विमानसेवा रविवारीदेखील प्रभावित होती. दरम्यान, बचाव व मदतकार्य सुरू झाले आहे.

### आजपासून नागपुरात राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन

**नागपूर :** राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार (दि.१६)पासून नागपूर येथे सुरू होत आहे. महायुती सरकारचा रविवारीच विस्तार झाल्यानंतर नवे मंत्रीमंडळ अधिवेशनासाठी पूर्ण ताकदीनिशी सज्ज झाले आहे. हिवाळी अधिवेशन २१ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. या अधिवेशनात सरकारकडून कोणती विधेयके पटलावर ठेवण्यात येणार आणि सभागृहात कोणकोणत्या विषयांवर चर्चा होणार हे महत्त्वाचे असेल.

## राज्यस्तरीय ११वी अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# प्राथमिक फेरीचा स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

**जळगाव : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा ११व्या वर्षी शानदार आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा जळगाव केंद्र येथून स्पर्धा प्रमुख तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १५) शुभारंभ झाला.

या वेळी समर्थ कला बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रमेश जाधव, परीक्षक अरविंद मराठे, मानसी दोषी यांच्यासह अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या टीममधील अमोल खेर, गणेश जगताप, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, जळगाव केंद्राचे प्रमुख विशाल जाधव उपस्थित होते.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

नाट्य चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.



या स्पर्धेची प्राथमिक राज्यातील विविध केंद्रांवर होऊन अंतिम फेरी १० ते १२ जानेवारीदरम्यान पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. **(पान २ वर..)**

# आवक वाढल्याने भाज्यांच्या दरात घट

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे येथील मार्केट यार्डातील घाऊक बाजारात आवक वाढल्याने कांदा, टोमॅटो, फ्लॉवरच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी घट झाली. शेवग्याच्या दरातही घट झाली असून अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (दि. १५) राज्य तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, राजस्थानातून वेगवेगळ्या भाज्या घेऊन वाहने आली. यामध्ये हिरवी मिरची, कोबी, पावटा, घेवडा, शेवगा, गाजर, मटार, तोतापुरी कैरी, लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले, भेंडी, गवार, टोमॅटो, हिरवी मिरची, ढोबळी मिरची, काकडी, कोबी, फ्लॉवर, तांबडा भोपळा, कांदा, बटाट्याची आवक झाली. दरम्यान, मेथी, कांदापात, शेपू, चुका या पालेभाज्यांच्या दरात घट झाली आहे. चाकवत, पुदिना, राजगिरा, अंबाडी, चवळई, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

मार्केट यार्डातील फळबाजारात बोरांच्या दरात ५ ते १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मोसंबी, कलिंगड, खरबूज, पपई आणि जुन्या बहारातील मोसंबीच्या दरात अल्पशी घट झाली आहे. पेरु, सीताफळ, अननस, चिकू, संत्री, नव्या बहरातील मोसंबीचे दर स्थिर असल्याचे व्यापाऱ्यांनी माहिती देताना सांगितले.

# स्वीडनचे दाम्पत्य सुधागडात करतेय शेती

**पाली : प्रतिनिधी**

स्वीडन देशातील दाम्पत्य सध्या सुधागड तालुक्यातील उद्धर येथील एका छोट्या गावात राहून शेतीची कामे करत आहेत. एवढेच काय तर ते इथले जेवणदेखील बनवायला शिकले आहेत. अवघ्या काही दिवसांत ग्रामीण संस्कृतीशी आणि निसर्गाशी त्यांची नाळ जोडली गेली आहे.





टायबेरिअस व त्याची पत्नी आमंडा स्वीडनवरून चार दिवसांपूर्वी सुधागडात आले आहेत. उद्धर येथील तुषार केळकर यांच्या आत्मतृप्ती या निसर्ग पर्यटन केंद्रामध्ये ते वास्तव्य करत आहेत. बांबूने बनवलेल्या व शेणाने सारवलेल्या झोपडीत अतिशय कमी संसाधनाचा वापर करून हे स्विडीश दाम्पत्य राहत आहेत. शिवाय येथे फक्त सौर उर्जेवर वीज मिळते. त्यामुळे अगदी नेमके विजेचे दिवे व एक फॅन उपलब्ध आहे.

टायबेरिअस हा स्वीडनमधील एका शाळेत शिक्षक असून आमंडा तेथील सुपर मार्केटमध्ये काम करते. आमंडा पहिल्यांदाच भारतामध्ये आली आहे, तर टायबेरीयस दुसऱ्यांदा भारतात आला. या दोघांची तुषार केळकर यांच्यासोबत सोशल मीडियाद्वारे मैत्री झाली आणि ते थेट येथे येऊन पोहचले. २२ डिसेंबरला ते येथून राजस्थानमध्ये जाणार आहेत. भारतातील ग्रामीण जीवन तसेच सांस्कृतिक विविधता हे सर्व त्यांना जाणून घ्यायचे आहे.

### ग्रामीण संस्कृतीशी एकरूप

तुषार केळकर यांनी आपल्या शेतामध्ये कलिंगड लागवड करण्यास सुरुवात केली आहे. या वेळी जमिनीची मशागत करणे, मातीचे आळे बनवणे, कलिंगडाच्या बिया लावणे त्यांना पाणी देणे आदी कामे टायबेरियस व त्याची पत्नी आमंडा मन लावून करताना दिसत आहेत. वेगवेगळ्या प्रकारची भाजीपाला लागवडही त्यांनी केली आहे. त्यांना केळकर यांचा छोटा मुलगा राहीदेखील मदत करतो.
हे दाम्पत्य अगदी गाईंचे शेण उचलण्यापासून हातात फावडे व कुदळ घेऊन मातीतली काम करण्यापर्यंत सर्व कामे करतात तसेच भारतीय खाद्यपदार्थ स्वत: बनवून खात आहेत.



**पनवेल : भाजप बेलपाडा कमिटी अध्यक्षपदी संतोष भगवान म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी सहकाऱ्यांसह माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. संतोष म्हात्रे यांच्यासमवेत उपाध्यक्ष संदीप म्हात्रे, अशोक पाटील, सचिव जयेंद्र ठाकूर, सहसचिव नामदेव पाटील, खजिनदार हनुमान म्हात्रे, सहखजिनदार किरण म्हात्रे, युवा अध्यक्ष भूषण ठाकूर, बूथ अध्यक्ष जगदीश पाटील, निलेश म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# अडीच वर्षांच्या मंत्रिपदातून अनेकांना सामावून घेतले जाईल -उपमुख्यमंत्री पवार





**नागपूर : प्रतिनिधी**

सर्वांनाच वाटते की आपल्याला मंत्रिमंडळात संधी मिळावी. नेते ताकदीचे, मात्र जागा मर्यादित असतात. मागच्या वेळी आपण जेव्हा सरकारमध्ये गेलो, तेव्हा काहींना मंत्रिपदाचा दीड वर्षाचा काळ मिळाला. आता या पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी आम्ही काहींना अडीच-अडीच वर्षांसाठी संधी द्यायचे ठरवले. यामध्ये अनेक मंत्री आणि राज्यमंत्री सामावून घेतले जातील. यामुळे अनेक जिल्ह्यांना, भागांना प्रतिनिधित्व मिळेल. यावर आमचे महायुतीच्या तिन्ही नेत्यांमध्ये एकमत झालेले आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर रविवारी (दि. १५) महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूरमध्ये झाला. तत्पूर्वी राष्ट्रवादीचा नागपूरमध्ये मेळावा झाला. त्या वेळी ते बोलत होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयातील निकाल केव्हाही येऊ शकतो. तीन वर्षांपासून सर्व जिल्ह्यातील निवडणुका झालेल्या नाहीत. आता मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर जी महामंडळे आहेत त्याच्या नेमणुका पुढील तीन महिन्यांत करण्याचे आम्ही ठरवले आहे. महामंडळाच्या वाटपावरून पाच वर्ष तुम्हाला आम्ही ताटकळत ठेवणार नाहीत, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

## क्लीनरच्या प्रसंगावधानामुळे खोपोलीत अपघात टळला

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील लोकवस्ती नजीक अनियंत्रित झालेला कॉईल वाहक ट्रक क्लीनरने प्रसंगावधान राखत चाकाना दगडाचा अडथळा केल्याने रविवारी संध्याकाळी मोठा अपघात टळला.

४० टन वजनाच्या लोखंडी कॉइल वाहक ट्रक रविवारी संध्याकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास सावरोलीहून खालापूर दिशेने जात असताना स्वामी विवेकानंद शाळे नजीक चढावावर चालकाचे नियंत्रण सुटले. अनियंत्रित ट्रक पाठीमागे उताराच्या दिशेने जाऊ लागल्याने क्लीनर रामसिंग याने ट्रक मधून उडी मारून तातडीने दगडाचा अडथळा केला.

महावितरणाचा विद्युत खांब काही फुटावरच आणि पाठीमागे लोक वस्ती असल्याने कॉईलसह ट्रक लोकवस्तीत घुसला असता तर मोठा अनर्थ घडला असता. ट्रक संपूर्ण रस्त्यात आडवा झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता.



## नवी मुंबईत गुरूचरित्र पारायण सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ब्रम्हांडनायक अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज व परमपूज्य गुरु माऊली अण्णासाहेब मोरे (अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर) यांच्या आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ सामाजिक संस्था सीवूड सेक्टर ४८ नवी मुंबई येथे श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह सोहळा सुरु आहे.




या सप्ताह सोहळ्यात रोज सकाळी भूपाळी आरती, श्री गुरुचरित्र सामूहिक पारायण, सामूहिक सेवा, नैवेद्य आरती, दैनंदिन सेवेमध्ये श्री गुरुचरित्र सामूहिक पारायण वाचन प्रारंभ श्री गणपती अथर्वशीर्ष, मनाचे श्लोक, श्री गीताई ग्रंथ वाचन, रुद्र व मल्हारी सप्तशती ग्रंथ वाचन, श्री विष्णुसहस्त्रनाम सुरु आहे. रविवारी १५ तारखेला श्रीदत्त जन्मोत्सव दुपारी बारा वाजून ३९ मिनिटांनी व सायंकाळी साडेसहा वाजता आरती व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या संधीचा लाभ सर्व स्वामी सेवकानी लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

## २१ डिसेंबर जागतिक ध्यान दिवस घोषित

**मुंबई : प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्र महासभेने भारताद्वारा सहप्रायोजित ठराव एकमताने मंजूर करत २१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस' म्हणून घोषित केला आहे. हा निर्णय 'वसुधैव कुटुंबकम' ही कल्पना जगभरात साकार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल.

'हिमालयीन समर्पण ध्यानयोग'चे प्रणेता सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजी गेल्या ३०वर्षांपासून समर्पण ध्यान संस्काराच्या माध्यमातून ध्यान सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. परमपूज्य स्वामीजींनी आपल्या प्रवचनात अनेकदा सांगितले आहे की, आपल्या पूर्वजांची 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना नुसतीच कल्पना नव्हती. 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजे संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे, सर्व समान आहेत. 'वसुधैव



कुटुंबकम' ही कल्पना योगवर आधारित होती. जगात असे कोणतेही एक पुस्तक नाही, अशी कोणतीही एक भाषा नाही, असा कोणताही धर्म नाही जो प्रत्येकजण मानत आहे, ज्याद्वारे विश्व एक कुटुंब आहे, असे मानता येईल. योग हे एकमेव माध्यम आहे ज्याद्वारे मनुष्य मनुष्याशी जोडला जात आहे.

आज ७२ देशांतील लोक समर्पण ध्यान संस्कारच्या माध्यमातून त्यांची आध्यात्मिक आणि सर्वांगीण प्रगती करत आहेत. संयुक्त राष्ट्र महासभेच्या या निर्णयाची परमपूज्य श्री शिवकृपानंद स्वामीजी यांनी प्रशंसा केली आहे आणि भारत देशाच्या या प्रयत्नासाठी अभिनंदन केले आहे. त्यांनी आपला आनंद व्यक्त करताना सांगितले की संयुक्त राष्ट्र महासभेचा हा निर्णय संपूर्ण मानवजातीसाठी लाभदायी आहे. आपण सर्व गेल्या ३० वर्षांपासून ७२ देशांमध्ये ध्यानाचा प्रचार-प्रसार करत आहोत, आपल्या कार्याला जणुकाही पुरस्कार प्राप्त झाला आहे! यामध्ये भारत देशाचे प्रयत्नही अतिशय कौतुकास्पद आहेत.

ध्यानाविषयी अधिक माहिती तुम्ही गुरुतत्त्व वैश्विक मंचची वेबसाइट gurutattva.org आणि YouTube चॅनेल 'Gurutattva'वरून मिळवू शकता.

## आत्महत्येप्रकरणी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीने केलेल्या आत्महत्या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी पती विकास रमेश यादव (रा. सोनचाफा सोसायटी सेक्टर ९ नेरे) याला अटक केली आहे.

घरातील सिलिंग फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विकास यादव, रमेश यादव, सीता यादव आणि कविता यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तालुका पोलिसांनी आरोपी पती विकास यादव याला अटक केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.



**पनवेल : खांदा कॉलनी सेक्टर ११ येथील श्री दत्त गणेश मंदिरातील जन्मोत्सव सोहळ्याला आमदार विक्रांत पाटील यांनी भेट. दिली. या वेळी त्यांचे स्वागत करताना ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश खानावकर व पदाधिकारी.**



**पनवेल : दत्तजयंतीनिमित्त माजी नगरसेविका दर्शना भोईर व त्यांच्या सहकाऱ्यांनी शहरातील विविध ठिकाणी आयोजित जयंती सोहळ्यांना भेटी दिल्या. या वेळी सर्वांचे आयोजकांकडून स्वागत  करण्यात आले.**

## शब्दवेल साहित्य संघाचे वार्षिक पुरस्कार जाहीर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सर्जनशील शब्दवेल साहित्य संघातर्फे दरवर्षी प्रदान करण्यात येणारे पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी निवड समितीच्या वतीने जाहीर केले.

यावर्षीचा शब्दवेल जीवनगौरव पुरस्कार- प्रा. उषा तांबे (अध्यक्ष, अ.भा.साहित्य महामंडळ), शब्दवेल बोलीभाषा संवर्धन पुरस्कार प्रा. एल. बी. पाटील (रायगड भुषण तथा मा. सदस्य महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ) शब्दवेल हास्यकवी गौरव पुरस्कार- प्रा. विजय पोहनेरकर, स्व.केशवराव पापडकर बाल प्रतिभावंत पुरस्कार अनुष्का संजय पवार, यालाप्पा तायाप्पा वैदू स्मृती शब्दवेल गुरूमाऊली शिक्षकरत्न पुरस्कार युवराज भगवंत माने यांना मिळणार आहे. यासह अन्य पुरस्कारांचेही वितरण होणार आहे. शब्दवेलचे चौथे राज्यस्तरीय साहित्य संमेलन लक्ष्मीकांत देशमुख (९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष) यांचे अध्यक्षतेखाली येत्या २२ डिसेंबर २०२४ रोजी कला वाणिज्य महाविद्यालयात करण्यात येणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे त्यामध्ये उद्घाटन सोहळा, कथाकथन, महिला कविसंमेलन, गझल मुशायरा, नारायण सुर्वे यांच्या कवितांचे सादरीकरण, कथाकथन, बोलीभाषा कविसंमेलन,बालसाहित्य सादरीकरण अशा दर्जेदार सत्रांचा समावेश आहे. संमेलनामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शब्दवेलचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर व प्रसिध्दी प्रमुख विलास पुंडले यांनी केले आहे.

पान १ वरुन

## राज्यस्तरीय ११वी अटल करंडक एकांकिका स्पर्धा

या एकांकिका स्पर्धेत राज्यभरातून १००हून अधिक एकांकिकांचा सहभाग असतो. नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे.

स्पर्धेतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे.

## दिवाळे कोळीवाड्यात दत्त जन्मोत्सव सोहळा



**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गुरुदेव दत्त जन्मोत्सवानिमित्त नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाड्यात हरि ओम सामाजिक सेवा भावी संस्थेच्या वतीने शनिवार (दि. १४) साईबाबा मंदिरात भजन कीर्तन हरिपाठ आणि अभंगवाणीमुळे संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण होते. या वेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. दत्तजन्म सोहळ्यानिमित्त मंदिराला आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती.या वेळी, पहाटेची काकड आरती, हरिपाठ व आरती, भजन, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुवर्ण पादुकांवर अभिषेक, गुरुचरित्र पारायण समाप्ती, हरिपाठ, दिवसभर विविध भजनी मंडळांच्या भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. श्री. दत्त जन्माचे पाळणागीत, सादर करून साईबाबा मंदिरापासून संपूर्ण गावप्रदक्षिणेसह टाळ-मृदूंगाच्या गजरात पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. .

यंदा मंडळाला २१ वर्ष पूर्ण झाली असून, श्री दत्तजन्म उत्सव सोहळ्यासाठी बेलापूर परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावली होती. अध्यक्ष रमेश बोस यांनी सांगितले.

## गव्हाण ज्युनिअर कॉलेज विद्यार्थ्यांची एमकेसीएलकडून तंत्रज्ञान जागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये एमकेसीएलद्वारे तंत्रज्ञान साक्षरता अर्थात तंत्रज्ञान जागृती करण्यात आली.

एमकेसीएल संचलित स्वरा कॉम्प्युटर्सच्या सुमती म्हात्रे, जागृती अंकुश पाटील आणि मेरीट टेक कॉम्प्युटर्स इन्स्टिटच्यूट चे संचालक हारून काझी व शाहीन काजी तसेच विश्वास मते यांनी कॉम्प्युटर संदर्भातील विविध कोर्स बद्दल माहिती दिली. एमकेसीएल बद्दल तसेच परीक्षेमध्ये टाईम मॅनेजमेंट कसे करावे, पेपर्स सोडवताना घ्यावयाची काळजी, आदर्श उत्तरपत्रिका कशी असावी या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. ए.आय.मुळे २१व्या शतकातील संगणकामध्ये होत असलेले प्रयोग त्यातीलच ए आय टेक्नॉलॉजी हिचा वापर वेगवेगळ्या एप्लीकेशनमध्ये कसा केला जातो या विषयाची माहिती प्रशिक्षक विश्वास मते यांनी दिली. विद्यार्थ्यांने संगणक शिक्षण घेणे ही काळाची गरज असून विद्यार्थी त्यामध्ये निरक्षर असु नये असे आवाहन करून संगणकाचे विविध फायदे सांगितले.

कार्यक्रम प्राचार्य गोवर्धन गोड्गे व रयतेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचे निर्देशान्वये झाला. ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बी.पी.पाटोळे, घरत सर, पाटील सर, ठाकूर मॅडम, पाटील मॅडम, तसेच इयत्ता बारावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



## निवडक

### बसच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल :** एनएमएमटी बसची एका ७० वर्षीय महिलेला धडक बसल्याने झालेल्या अपघातात महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील बारवई गावाजवळ घडली आहे. यमुना पवार (वय ७०) या किर्तन आटोपून घरी येत असताना बारवई गावालगतचा रस्ता ओलांडत असताना भरधाव एनएमएमटी बसने त्यांना धडक दिली. या धडकेत त्या गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### चिरनेरमध्ये ग्राम प्रदक्षिणा पायी दिंडी

**उरण :** चिरनेर-कातळपाडा येथे दत्तजयंतीच्या पूर्व संध्येला दत्तगुरूंची ग्रामप्रदक्षिणा भिक्षेच्या पायी दिंडीमध्ये



मोठ्या भक्तीभावाने शेकडो भक्तगण सहभागी होता. पायी दिंडी सोबत केळवणे येथील दहागांव पौर्णिमा मंडळाचे अनुयायी ह.भ.प. अनिल महाराज म्हात्रे, ह.भ.प.रमेश महाराज गोंधळी यांच्यासह भक्तगण, महिला भगिनी टाळ मृदूंगाच्या तालासुरात भक्तीगीतांचा नजराणा सादर करीत संपूर्ण गावात दत्तगुरूंची ग्रामप्रदक्षिणा दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी घराघरातील महिला भगिनींनी दत्तगुरूंच्या प्रतिमेचे औक्षण करून मनोभावे पूजन केले.

# उरण-पनवेल मार्गावर बसवले गतिरोधक

## ◆ अपघातांचे प्रमाण कमी होण्यासाठी उपयुक्त
## ◆ प्रवासी, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी गतिरोधक नसल्याने अनेक अपघात झालेले आहेत. या अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले तर काही जणांचे मृत्यूदेखील झाले आहेत. गतिरोधक नसल्याने उरण पनवेल मार्गावर अपघाताची मालिका सुरू होती, कारण गतिरोधक नसल्याने वाहनेदेखील भरधाव वेगाने येत जात होती. त्यामुळे रस्ता ओलांडताना अपघात होणे असे प्रकार वाढले होते नागरिकांची अडचण पाहता आता उरण पनवेल रस्त्यावर गतिरोधक बसवले असून, वाहनांचा वेग नियंत्रणात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास घेतला आहे.

गतिरोधक नसल्याने उरण पनवेल रस्त्यावरील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल मुळेखंड येथे शाळेत ये-जा करताना नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या धोका निर्माण झाला होता. वाहने वेगात जात असल्याने लहान मुलांना व पालकांना जीव मुठीत घेउन प्रवास करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन प्रवाशांचे, नागरिकांचे अपघात होऊ नयेत, अपघात होऊन कोणाचे मृत्यू होऊ नयेत या दृष्टिकोनातून प्रवाशी वर्गांचा प्रवास सुखकर, आनंददायी व्हावा या हेतूने उरणमधील सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांनी उरण पनवेल मुख्य मार्गावर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कूल मुळेखंड येथे गतिरोधक बसविण्यात यावे, अशी मागणी सिडको व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती.

त्यासाठी त्यांनी सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावाही केला होता. आता या पाठपुराव्याला यश आले असून मयूर सुतार यांच्या मागणीची दखल घेण्यात आली असून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल समोर, मुळेखंड येथे गतिरोधक बसविण्यात आले आहेत. गतिरोधक बसविल्याने विविध वाहने सावकाश व शिस्त बद्ध पद्धतीने येत जात आहेत. गतिरोधक बसविल्याने आता नागरिकांचा प्रवास सुखकर, आनंददायी बनला आहे. गतिरोधक मुळे आता अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

शाळेतील लहान मुलांना आणि त्यांच्या पालकांना आता शाळेत येणे जाणे सोप्पे, सुलभ झाले आहे. त्यामुळे उरणमधील नागरिकांनी, जनतेने, शाळेतील विद्यार्थी, पालकांनी, शिक्षकांनी सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.



मोहोपाडा : दत्त जयंतीनिमित्त वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व भाजपचे वासांबे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष सचिन तांडेल यांनी विभागात ठिकठिकाणी आयोजित केलेल्या जयंती सोहळ्यांना भेट देत दर्शन घेतले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

## तक्का येथे जलवाहिनीच्या कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येत्या पाच वर्षांच्या काळात पनवेल महापालिका क्षेत्रासह विधानसभा मतदार संघात कोणत्याही प्रकारची समस्या राहणार नाही अश्या पद्धतीचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असल्याची ग्वाही भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भघत यांनी तक्का येथे जलवाहिनीच्या कामाच्या शुभारंभावेळी दिली.



तक्का येथील मोराज सोसायटीच्या छोटा गेट तसेच नॅशनल गार्डन सोसयटी या परिसरातील नागरिकांचा पाणी पुरवठ्याची समस्या भेडसावत होती. याबाबात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वखाली माजी नगरसेवक अजय बहिरा यांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्याला यश आले असून पनवेल महापालिकेच्या वतीने १८ इंचाची आणि ४८० मिटर लांबीची जलवाहिनी या ठिकाणी टाकण्यात येणात आहे. १८ लाख रुपयांच्या निधीमधून करण्यात येणाऱ्या या विकास कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते रविवारी (दि.१५) झाले.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, रघुनाथ बहिरा, महेश राउळ, युवा नेते प्रतिक बहिरा, केदार भगत, भारत बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रहिवासी उपस्थित होते.

## महेश बालदी मित्र मंडळातर्फे महाप्रसाद

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरणमध्ये दत्त जयंतीनिमित्त शहरातील देऊळवाडीमधील प्रसिद्ध दत्त मंदिर येथे देऊळवाडी युवक मंडळ व महेश बालदी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते.

या वेळी आमदार महेश बालदी, भाजप शहराध्यक्ष कौशिक शहा, तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, तालुका चिटनीस प्रकाश ठाकूर, शहर युवा अध्यक्ष नीलेश पाटील उर्फ जय हरी, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, धनंजय कडवे, नितिन पाटिल, रोहित पाटील, हितेश शहा, सविन म्हात्रे, मनोहर सहातिया, देऊळवाडी युवक मंडळाचे निरंजन नार्वेकर, श्री दत्त मंदिराचे पुजारी ओमकार सुनिल बैरागी, निशांत चव्हाण, विपुल झुजम, रंजन मुरुडकर, सतीश पुजारी, दत्ताराम पाटील, जतिन तवसाळकर, प्रवीण सुर्वे, गिरीश गुडेकर, प्रसाद म्हात्रे, पत्रकार विठ्ठल ममताबादे, तुषार म्हात्रे, आकाश जाधव, आशिष न्यायी, सुहास जुवेकर, कमळाकर घरत, साईनाथ ममताबादे आदी उपस्थित होते.





पनवेल : येथील कुंभारवाड्यामध्ये दत्त जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.



पनवेल : भाजप बेलपाडा कमिटी अध्यक्षपदी संतोष भगवान म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी सहकाऱ्यांसह पक्षाचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. सोबत उपाध्यक्ष संदीप म्हात्रे, अशोक पाटील, सचिव जयेंद्र ठाकूर, सहसचिव नामदेव पाटील, खजिनदार हनुमान म्हात्रे, सहखजिनदार किरण म्हात्रे, युवा अध्यक्ष भूषण ठाकूर, बूथ अध्यक्ष जगदीश पाटील, निलेश म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्त जयंती मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत गव्हाण शिवाजीनगर येथील श्री समर्थ सद्‌गुरू बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत रविवारी माऊलींवर पुष्पवृष्टी झाली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत तसेच वसंतशेठ पाटील, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कल्पना ठाकूर तसेच वर्षा ठाकूर व अन्य उपस्थित होते.



पनवेल : भाजपच्या भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, उपाध्यक्ष विनोद बोरसे, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष केशव यादव, अमोल पालवे, मच्छिंद्र कुरुंद, सुभाष जाधव, महादेव पाटील, कदम यांच्यासह गुडीपाडवा समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.









पनवेल : शिवाजीनगर येथील श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात श्री. रामशेठ ठाकूर ग्रामस्थ मंडळ संयोजित, देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) यांच्यातर्फे गुरुचरित्रामृत ग्रंथ, श्री दासबाधे ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचा पारायण सोहळा १३ ते १५ डिसेंबररदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या सांगता कार्यक्रमाआधी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अनेकांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी भजन, कीर्तन इत्यादी सेवा देणाऱ्या मान्यवरांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.

## संपादकीय

# भक्कम महायुती सरकार

राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला उपराजधानी नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा झाला. यामध्ये भाजपचे १९, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ११ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नऊ अशा एकूण ३९ मंत्र्यांचा समावेश आहे. यासह एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला.

**विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महाविकास आघाडीचा दारूण पराभव झाल्यानंतर काही दिवसांनी महायुतीचे सरकार स्थापन झाले. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, तर शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारली. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी राज्याचा गाडा हाकण्यास नव्याने सुरुवात केल्यानंतर पूर्ण मंत्रीमंडळ कधी स्थापन होणार आणि कुणा कुणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर यावरून पडदा उठला असून नागपूर येथील राजभवनाच्या प्रांगणात शानदार शपथविधी सोहळा पार पडला. १९९१नंतर प्रथमच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी झाला. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी नवीन मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यामध्ये भाजपकडून चंद्रशेखर बावनकुळे, गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, पंकज भोयर, राधाकृष्ण विखे-पाटील, मंगल प्रभात लोढा, शिवेंद्रराजे भोसले, मेघना बोर्डीकर, नितेश राणे, माधुरी मिसाळ, गणेश नाईक, आशिष शेलार, संजय सावकारे, आकाश फुंडकर, जयकुमार गोरे, अतुल सावे, अशोक उईके यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शिवसेनेच्या मंत्र्यांमध्ये गुलाबराव पाटील, दादा भुसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, आशिष जैस्वाल व योगेश कदम यांचा समावेश आहे; तर राष्ट्रवादीकडून हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव, इंद्रनील नाईक, माणिकराव कोकाटे यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. मंत्रिमंडळ विस्तारात एकूण ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली आहे. यामध्ये भाजपचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली. यात ३३ कॅबिनेट, तर सहा राज्यमंत्री आहेत. भाजपच्या तीन, शिवसेनेच्या दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका मंत्र्याला राज्यमंत्रिपदाची शपथ देण्यात आली आहे. महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात प्रादेशिक आणि जातीय संतुलनावर भर दिल्याचे दिसत आहे. त्याचप्रामाणे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर ठेवून काही चेहरे मंत्रिमंडळात घेण्यात आले आहेत. हिवाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. त्याच्या आधी मंत्रिमंडळ स्थापन करून सत्ताधारी महायुतीने मंत्रीमंडळ विस्तार का रखडला, तो कधी होणार या विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर दिले आहे. ५ डिसेंबरला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली होती. मुंबईत मोठा सोहळा झाला होता. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराची प्रतीक्षा होती. अखेर हा विस्तारही झाला. या मंत्रिमंडळात चार महिलांना स्थान देण्यात आले आहे. शिवाय विविध समाज घटकांना सामावून घेत या पुढील काळातही सर्व जनतेला सोबत घेत काम करणार असल्याचा संदेश महायुती सरकारने दिला आहे.**

# कर्जतमध्ये 'लाल परी'चा वेग मंदावलेलाच!





**खबरबात**
विजय मांडे

ऐंशीच्या दशकात लालपरीमुळे दळण-वळण करणे सोपे झाले होते. त्यानंतर तीन चाकी रिक्षा, खासगी वाहने सुरू झाली. कर्जतला त्याच सुमारास एसटी आगार सुरू झाले तत्पूर्वी पनवेलहून कर्जतकरांना एसटीची सुविधा मिळत होती. अनेक वर्षे दुग्धव्यवसायिक, चाकरमानी, विद्यार्थी याच लालपरीने इच्छित ठिकाणी प्रवास करीत असत. काही वर्षांपूर्वी प्रवासाची साधने, काही एसटी कर्मचाऱ्यांची मनमानी आदी कारणांमुळे एसटीला घरघर लागली. कोरोना काळात प्रवाशांसाठी असलेली एसटी बंद होती. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांनी संप केल्याने ही सुविधा बरेच महिने बंद होती. परिणामी प्रवाशांनी अन्य पर्याय निवडले आणि एसटीच्या अडचणींमध्ये भर पडली. त्याचा परिणाम खेड्या-पाड्यात असलेल्या सामान्य जनतेवर झाला. अनेक गावांमध्ये एसटी जायची बंद झाली. तिला ब्रेक बसला आणि सर्वसामान्याच्या बरोबरच विद्यार्थ्यांचीही कोंडी झाली. विशेष म्हणजे लाल परीची पांढरी परी कधी झाली हे समजलेच नाही तसेच डिझेलची जागा सीएनजीने घेतली.

माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांच्या प्रयत्नाने १६ ऑक्टोबर १९८० रोजी कर्जत एसटी आगार सुरू झाले. तत्पूर्वी पनवेल आगराच्या एसटी बस कर्जतला येत असत आणि रेल्वे स्टेशन नजीकच्या एसटी स्टँडवरून बसचे नियोजन होत असे. आगार सुरू झाल्याने तालुक्याच्या अगदी दुर्गम भागात एसटी जाऊ लागली आणि सर्वांची सोय झाली. नवीनच आगार सुरू झाल्याने स्थानिक कर्मचारी आपल्या घरी दररोज जाऊ लागले अन्यथा त्यांना कामाच्या ठिकाणीच रहावे लागत असे व आठवडाभराने घर दिसत असे.

कर्जत तालुक्यात गावोगावी एसटी जाऊ लागली. ग्रामीण भागातील जनतेला ती आपलीशी वाटू लागली. कारण त्यांची खरी जीवन वाहिनी एसटीच होती. तालुक्याच्या ग्रामीण भागातील दुग्धव्यवसायिक याच लालपरीने मुंबईकडे जाण्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकावर येत असत. त्यावेळी फार थोड्या लोकांकडे स्वतःची वाहने म्हणजे मोटरसायकल होत्या. एसटी नव्हती तेव्हा दहा-बारा किलोमीटर अंतरावरील गावांमधून पहाटे बैलगाडीतून दुधाचे हांडे भरून येत असत तर पाच-सहा किलोमीटर गावातील व्यवसायिक डोक्यावर दुधाचे हांडे घेऊन कर्जत शहराकडे येत असत. त्यानंतर सायकल ही दुग्ध व्यवसायिकांची सखी बनली आणि गावो गावी एसटी सुरू झाल्यानंतर एक हक्काचे साधन दुग्धव्यवसायिकांसाठी ठरले. त्याकाळी आमदार, खासदारसुद्धा एसटीने प्रवास करीत असत. हे अनेकांनी पाहिले आहे.

एसटी सुरू झाल्याने मुलांच्या बरोबरीने मुलीही माध्यमिक शिक्षणासाठी शहरात येऊ लागल्या. त्यानंतर त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठीही लालपरीची खूप मदत झाली. आपल्यामुळेच हे सारे होत आहे. या अविर्भावात काही एसटी वाहक, चालकांच्या डोक्यात हवा गेली. त्यांची मग मनमानी सुरू झाली. एसटीत जागा असली तरी डबल बेल बाजू लागली. लोकांना पर्याय नव्हता म्हणून त्यांनी सारे काही सहन केले. कालांतराने अनेक प्रवासाची साधने उपलब्ध झाली. त्याचा परिणाम एसटीवर होऊ लागला. मग 'हात दाखविला तेथे थांबा' अशी कल्पना सुरू झाली. त्यानंतर सहा आसनी रिक्षा आल्या. या वाहनाचे विशेष म्हणजे अगदी घरा शेजारी नेऊन ते सोडत असत. त्यामुळे एसटी बाजूला असली तरी प्रवासी सहा आसनी रिक्षेत बसू लागली आणि खऱ्या अर्थाने एसटीला घरघर सुरू झाली. कर्जत आगार कधीही बंद होईल. अशी परिस्थिती निर्माण झाली होती, मात्र डिझेलच्या जागी सीएनजी आल्याने एसटी महामंडळाच्या डोक्यावरील ओझे खांद्यावर आले.

कर्जत आगाराच्या बाबतीत बोलायचे झाले तर या अवस्थेत आगार टिकविण्याची धडपड काही आगार व्यवस्थापकांनी केली. त्यामध्ये बी.डी. मगदूम, डी.एस. देशमुख, शंकर यादव यांची नावे घ्यावी लागतील. देशमुख तर चालक होते. त्यांच्याकडे आगार व्यवस्थापकपदाचा पदभार आला आणि त्यांनी आपल्या अनुभवाने कर्जत आगार जिल्ह्याबरोबर महाराष्ट्रातसुद्धा प्रथम क्रमांकावर नेऊन ठेवले, मात्र त्याचे बक्षीस म्हणून त्यांना खूप त्रास सहन करावा लागला होता. त्यानंतर यादव यांनीसुद्धा कोरोनाच्या काळात आगार सुस्थितीत राहण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनाही मनस्ताप सहन करावा लागला. मध्यंतरी मानसी शेळके या महिला आगर व्यवस्थापिकेनेसुध्दा चांगले काम केले. सध्या देवानंद मोरे यांच्याकडे आगार व्यवस्थापकपदाचा पदभार आहे. तेसुध्दा त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने आगार असे चांगले चालेल याकडे लक्ष देत असतात. कोरोना काळात संप केल्याने नवी मुंबई परिवहन सेवेच्या बस येऊ लागल्या. त्यांचे तिकीट एसटीपेक्षा कमी आहे. त्यामुळे प्रवाशांची आर्थिक बचत होऊ लागल्याने त्या बसची पसंती वाढू लागली. संप मिटल्यानंतर एसटी सुरू झाली पण ठराविक मार्गातील एसटीला प्रवासी मिळू लागले. अनेक गावांमधील एसटी बस प्रवाशां अभावी बंद करण्यात आल्या. त्यातच महिलांना पन्नास टक्के भाडे तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास या योजना एसटीला तारक ठरल्या. कर्जत एसटी आगाराला पंचेचाळीस वर्षांहून अधिक वर्षे झाली. त्यावेळी बांधलेल्या इमारती सुस्थितीत राहिल्या नाहीत. आगार व्यवस्थापकांचे निवासस्थान सुध्दा कधी कोसळेल? याचा नेम नाही. आनंदाची बाब म्हणजे कर्जत आगारात सीएनजी पंप सुरू झाल्याने येथील खासगी वाहन चालकांची सुध्दा सोय झाली आहे. आगाराचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

अनेक शाळा, महाविद्यालयाच्या बस गावा पर्यंत नव्हे तर अगदी घरापर्यंत येऊ लागल्या. अनेक प्रवासाची साधने सहज उपलब्ध होऊ लागल्याने गावा गावातील एसटीला ब्रेक लागला आणि मग प्रवाशांना एसटीची उणीव भासू लागली. ज्येष्ठ नागरिकांना सवलत, विद्यार्थ्यांना सवलत, अपंगांना सवलत, विद्यार्थिनी व ७५ वर्षांनंतरच्या जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आदी लाभ घेणे बंद झाले. एसटी तोट्यात जाण्यात जेव्हढा काही आगाऊ कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे तितकाच गावो गावच्या प्रवाशांचाही आहे. आमच्या गावाला एसटी सुरू करा, असे लोकप्रतिनिधींना कार्यकर्ते सांगतात आणि तेसुध्दा कोणताही ताळेबंद न पाहता एसटी सुरू करतात, मात्र सर्वांत सुरक्षित प्रवास असला तरी अन्य खासगी वाहनाने प्रवास करणे पसंद करतात. मग त्यांनी कितीही भाडे घेले तरी चुपचाप ते देतात आणि एसटीने नाममात्र दरवाढ केली तर मात्र एसटीमध्ये कधीही न बसलेले बोंबा मारण्यात पुढे असतात. खरे म्हणजे काही प्रवासी सोईनुसार एसटीकडे पाठ करतात. सुरू केलेली फेरी तोट्यात जाते, परंतु लोकतिनिधींचा रोष नको म्हणून आगार व्यवस्थापक काहीच बोलत नाही, हे कटू सत्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोनमध्ये नको असलेले ॲप्स असे करा अर्काइव्ह

बहुतेक स्मार्टफोन आता १२८ जीबी स्टोरेजसह येतात, पण स्मार्टफोनमधील हे स्टोरेज महत्त्वाचे फोटो, व्हिडीओ, फाईल्सने लगेच भरून जातात. आपण सहसा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. जेव्हा स्टोरेज भरलेले असते, तेव्हा तुम्हाला ई-मेल पाठवण्यात, गुगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो.



फोनमधील स्टोरेजची समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक खास युक्ती घेऊन आलो आहोत. ॲण्ड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अनेक नको असलेले ॲप्सदेखील जास्त स्टोरेज फुल होण्यास कारणीभूत असतात. अनेक इन्स्टॉल केलेले ॲप्स फोनमधील महत्वाची जागा व्यापून घेतात. यातील असे अनेक ॲप्स असतात जे आपण इन्स्टाल करतो, पण त्याचा वापर करतच नाही.

ॲण्ड्रॉइड युजर्ससाठी, Googleने एक फीचर सादर केले आहे, जे न वापरलेले ॲप्स आपल्या फोनवरून अर्काइव्ह करतात आणि स्मार्टफोनमधील जागा मोकळी करतात. न वापरलेले ॲप्सचे चिन्ह, युजर डेटा आणि बेसिक फंक्शनलिटी इन्टॅक्टसह युजर्स रिमूव्ह करू शकतात. जेव्हा डिव्हाइसचे स्टोरेज कमी असेल तेव्हा तुम्ही ते पुन्हा ऑटो-अर्काइव्ह करू शकता.


या फीचरचा वापर कसा करायचा चला पाहू

* मोबाइलमधील प्ले स्टोअरमध्ये जा.
* प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.
* यानंतर सेटिंग पर्यायावर क्लिक करा.
* सगळ्यात वर असणाऱ्या Generalवर क्लिक करा.
* खाली स्क्रोल करा आणि Automatically Archive Apps ऑन करा.

एकदा तुम्ही हे फीचर एनेबल केले की, तुमच्या फोनवरील न वापरलेले ॲप्स अर्काइव्ह केले जातील. कोणतीही महत्त्वाची फाईल डिलीट न करता तुम्ही तुमच्या फोनचे स्टोरेज अगदी सोप्या पद्धतीने खाली करू शकता. अनेकदा निरनिराळ्या ॲप्समुळे स्मार्टफोन भरून जातो आणि काही वेळी नेमका महत्त्वाच्या कामावेळी अडथळा निर्माण होतो. तेव्हा वर सांगितलले फीचर वापरून पहा.

# विनोदी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे

आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य करणारा अभिनेता म्हणजे लक्ष्मीकांत बेर्डे उर्फ लक्ष्या. विनोदाचा उपजात कौशल्य आणि अचूक टाइमिंग हे लक्ष्याचे वैशिष्ट्य. ते विनोदी अभिनेते म्हणून जरी जास्त प्रसिद्ध असले तरी कित्येक चित्रपटांमधून त्यांनी गंभीर भूमिकासुद्धा अगदी तंतोतंत वठवल्यात. विनोदी भूमिकांमध्ये त्यांनी महारत प्राप्त केली होती. म्हणून आयुष्यभर ते विनोदी अभिनेता म्हणूनच ओळखले गेले. त्यांचा आज स्मृतिदिन...



**निमित्त**

लक्ष्मीकांत बेर्डे यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी रत्नागिरी येथे झाला. लक्ष्या हा त्याच्या पाच भावंडांपैकी एक. आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांनी लहानपणी लॉटरीची तिकिटेसुद्धा विकली आहेत. खेरवाडी येथील युनियन हायस्कूल या शाळेतून त्याचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर भवन्स या महाविद्यालयातून पदवी मिळवली. आपल्याला विश्वास बसणार नाही, पण मोठे झाल्यावर आपण कंडक्टर व्हायचे असे त्याचे स्वप्न होते, कारण कंडक्टरजवळील पैशाने भरलेली बॅग पाहून त्यांना असं वाटत होतं की हे सगळे पैसे त्याचेच असतात. गणेशोत्सवातील कार्यक्रमातून अभिनयाचा एक छोटासा प्लॅटफॉर्म त्यांना मिळाला आणि ते आपल्या भूमिका साकारू लागले. त्यानंतर शाळा आणि कॉलेजमधून त्यांनी बऱ्याच नाटकांत कामे केली.

नाटकांमध्ये सगळे व्यवस्थित चालू असले तरी त्यांना चित्रपटात काम करण्याची तीव्र इच्छा होती. लवकरच त्यांची ही इच्छा पूर्ण झाली ती लेक चालली सासरला या चित्रपटाच्या रूपात. हा त्यांचा पहिला चित्रपट, जो तितकेसे व्यवसायिक यश देऊ शकला नाही. त्यामुळे लक्ष्मीकांत यांची परिस्थिती मर्यादितच राहिली. प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक महेश कोठारे यांनी लक्ष्याचा अभिनय पाहून आपल्या दे दणादण या चित्रपटामधून त्याला सहाय्यक अभिनेत्याची भूमिका करण्याची संधी दिली. मिळालेल्या संधीचा सोने करणार नाही तो लक्ष्या कसला. हा चित्रपट आणि लक्ष्या दोघेही सुपरहिट ठरले. महेश कोठारे यांच्या धूमधडाका या चित्रपटात त्यांनी अशोक सराफ व स्वतः कोठारे यांच्यासोबत भूमिका केली आणि अभिनयाचे बरेच दरवाजे त्यांच्यासाठी उघडले गेले. या चित्रपटाने अभूतपूर्व यश मिळवले. एक धमाल विनोदी अभिनेता म्हणून लक्ष्मीकांत जनमानसात ओळखले जाऊ लागले. लहान मुलांपासून ते अगदी वृद्धांपर्यंत सर्वजण त्यांचा अभिनय पाहून अगदी पोट धरून हसत होते. सचिन पिळगावकर दिग्दर्शित अशी ही बनवाबनवी या चित्रपटातील त्यांची साडी नेसून साकारलेली विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडून गेली.

लक्ष्मीकांत बेर्डे यांची दिवसेंदिवस वाढत असलेली लोकप्रियता पाहून महेश कोठारे यांनी त्यांना आपल्या बऱ्याच चित्रपटांत विनोदी भूमिका करण्याची संधी दिली. लक्षाच्या यशात रूही बेर्डे यांचा सिंहाचा वाटा आहे, पण नियतीला हा विवाह जास्त काळ मान्य नव्हता. त्यांची कायमची ताटातूट झाली ती रूईच्या निधनाने. १९९८मध्ये रुही बेर्डे यांचे निधन झाले. यानंतर त्यांनी लग्न केले ते अभिनेत्री प्रिया अरुण यांच्याबरोबर. लक्ष्या व प्रिया यांनी बऱ्याच चित्रपटांमध्ये बरोबरच काम केले आहे.

मृत्यूपूर्वी लक्ष्मीकांत बेर्डे यांनी आपल्या मुलाच्या नावाने अभिनय आर्ट प्रोडक्शन सुरू केले होते. बेर्डे यांना अभिनय आणि स्वानंदी नावाची दोन मुले आहेत. त्यांचा मुलगा अभिनय हासुद्धा चित्रपट अभिनेता आहे. लक्ष्मीकांत यांचे १६ डिसेंबर २००४ रोजी अकाली निधन झाले. त्यांची आठवण नकळत डोळ्याच्या कडा पाणून गेल्याशिवाय राहत नाही.

**(साभार : मराठी दुनिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**कर्जत : सध्या वातावरण आल्हाददायक आहे. त्यामुळे रिसॉर्ट्स व परिसराला निसर्गाचा अधिकच साज चढला आहे.**

## आरोग्य प्रहर

# गर्भधारणेसाठी महिलांमध्ये 'हे' व्हिटॅमिन आवश्यक

व्हिटॅमिन डीची कमतरता शरीरासाठी चांगली नाही हे सर्वांनाच माहिती आहे, परंतु त्याचा गर्भधारणेशी थेट संबंध आहे. पोषणतज्ज्ञ पूजा (अजवानी) जैस्वालिन यांनी व्हिटॅमिन डी गर्भधारणेसाठी महत्त्वाचे असले तरीही त्याचे योग्य प्रमाण असणं गरजेचं आहे, असे म्हटले आहे.



खराडी येथील मदरहूड हॉस्पिटलच्या सल्लागार, प्रसूतीतज्ज्ञ आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मानसी शर्मा यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली. त्या सांगतात की, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचा संबंध हार्मोनल असंतुलनाशी जोडलेला आहे, ज्यामुळे प्रजनन आणि गर्भधारणेच्या परिणामांवर परिणाम होऊ शकतो.

कॅल्शियम आणि फॉस्फरसचे शोषण आणि चयापचय यासाठी व्हिटॅमिन डी आवश्यक असल्यामुळे निरोगी गर्भधारणेसाठी पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन डीची पातळी महत्त्वपूर्ण आहे. कॅल्शियम शोषण, रोगप्रतिकारक शक्तीचे आरोग्य आणि पेशींच्या वाढीसह विविध शारीरिक कार्यांसाठी व्हिटॅमिन डी महत्त्वपूर्ण आहे. गर्भवती महिलांसाठी माता आणि गर्भाच्या आरोग्यासाठी पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन डीचे प्रमाण विशेषतः महत्त्वाचे आहे. अनेक अभ्यासांमध्ये कमी सीरम व्हिटॅमिन डी पातळी आणि विशिष्ट प्रकारचे कर्करोग, ऑटोइम्यून रोग, न्यूरोलॉजिकल रोग, इन्सुलिन प्रतिरोधकता आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोगांचा वाढता धोका यांच्यातील संबंध सूचित करतात, असे डॉ. शर्मा म्हणाल्या.

मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबईतील सल्लागार पोषण आणि आहारतज्ज्ञ डीटी आरती सिंग यांनी सहमती दर्शवली आणि नमूद केले की, गर्भधारणेदरम्यान पौष्टिक कमतरता, विशेषतः व्हिटॅमिन डीची कमतरता सामान्य आहे. आहारतज्ज्ञ आरती सिंग पुढे सांगतात की, गर्भधारणेदरम्यान व्हिटॅमिन डीची पातळी कमी झाल्यास मधुमेह आणि गर्भपाताचा धोका होऊ शकतो. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेसाठी अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात. यामध्ये सूर्यप्रकाशाचा मर्यादित संपर्क, खराब आहाराच्या सवयी, लठ्ठपणा आणि काही वैद्यकीय परिस्थितीचा समावेश आहे.

गर्भधारणेदरम्यान व्हिटॅमिन डीची सामान्य पातळी ३० एनजी/एमएल किंवा त्याहून अधिक असावी. व्हिटॅमिन डीची ही सामान्य पातळी राखून तुम्ही निरोगी गर्भधारणा करू शकता. यासाठी भाज्या, दुग्धजन्य पदार्थ, फळे, नट आणि दूध, दही, पनीर, फॅटी मासे, अंडी आणि मशरूम यांसारख्या व्हिटॅमिन डीच्या पुरेशा प्रमाणात समृद्ध असलेले अधिक पदार्थांचे सेवन करा. दररोज किमान २० ते ३० मिनिटे सूर्यप्रकाशाच्या संपर्कात या. यानंतरही व्हिटॅमिन डीची कमतरता कायम राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. प्रभावी परिणामांसाठी डॉक्टर काही आहारातील बदल किंवा पूरक आहार सुचवू शकतात.

# माझी वसुंधरा अभियानात खोपोली पालिकेला ५० लाखांचे बक्षीस; राज्यात २३वा क्रमांक

**खोपोली : प्रतिनिधी**

'माझी वसुंधरा अभियान ०५ 'मध्ये खोपोली नगरपरिषदेने महाराष्ट्र राज्यात २३ वा क्रमांक आणि ५० हजार ते १ लक्ष या लोकसंख्येच्या प्रवर्गामध्ये कोकण विभागात तिसरा क्रमांक पटकाविला आहे . शासनाकडून पालिकेला ५० लाखांचे बक्षीस जाहीर झाले आहे.

पर्यावरण व वातावरण बदल विभागाने पंचतत्वाचे संवर्धन, संरक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी सुरु केलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ०५ 'मध्ये खोपोली नगरपरिषदने सहभाग घेतला होता. या अभियानातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नगरपरिषदांचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे. यात खोपोली नगरपरिषदेने महाराष्ट्र राज्यात २३ वा क्रमांक आणि ५० हजार ते १ लक्ष या लोकसंख्येच्या प्रवर्गामध्ये कोकण विभागात तिसरा क्रमांक पटकाविला आहे . शासनाकडून पालिकेला ५० लाखांचे बक्षीस जाहीर झाले आहे. लवकरच महाराष्ट्र शासन स्तरांवर सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि ५० लाख एवढी रक्कम बक्षीस स्वरूपात वितरीत केली जाणार आहे.

राज्य व केंद्र स्तरावर माझी वसुंधरा अभियान हे दरवर्षी संपूर्ण राज्यात राबविण्यात येते. याअंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचमहाभूतांच्या आधारे विविध घटकांची तपासणी केली जाते. शहरातील वृक्षारोपण व पूर्वी लावलेल्या वृक्षांचे संवर्धन तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात तयार होणाऱ्या सेंद्रिय खतास, सौरऊर्जा प्रकल्प, शहरातील सुशोभीकरण आणि हरित क्षेत्रांची, जलस्त्रोतांची निगा राखणे इ. अशा नानाविध उपक्रमांची तपासणी सरकारमार्फत त्रयस्थ संस्थेद्वारे केली जाते. तसेच शहरातील नागरिकांकडून सर्वेक्षण दरम्यान प्रतिक्रिया घेण्यात येतात.घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत प्लास्टिक बंदी करिता मोहीम राबवणे, महिला बचत गटाच्या संयुक्त विद्यमाने कापडी पिशवी अभियान,चौक सुशोकिरण , जौगिंग पद निर्मिती , खुली व्यायाम गार्डने निर्मिती या सर्व उपक्रमांची दखल राज्य सरकारकडून घेतली आहे .या यशामध्ये शहरातील सर्वसामान्य नागरिक, माजी लोकप्रतिनिधी सह कोकण आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी किशन जावळे ,उपायुक्त गणेश शेटे या वरिष्ठांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन मिळल्याचेही मुख्याधिकारी व प्रशासक डॉ पंकज पाटील यांनी सांगितले.

### उत्तम नियोजनाची फलनिष्पत्ती

*आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून खोपोली घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मिळालेल्या विविध प्रकारच्या मशीन सामग्री, खोपोली तलाव सुशोभीकरण, शहरातील सुशोभीकरण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन व नियोजन उत्तम झाल्याने याचीच फलनिष्पत्ती यंदाच्या निकालातून दिसून येत असल्याचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.पंकज पाटील यांनी सांगितले.*



# उष:काल संगीत रजनीने कर्जतकर मंत्रमुग्ध



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री दत्त जयंतीनिमित्त विठ्ठल नगरमध्ये यशोधन मध्ये असलेल्या श्री दत्त मंदिरात जन्म सोहळा झाल्यानंतर रात्री संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत मधील उष:काल मराठी वाद्य वृंदच्या कलाकारांनी गीते सादर करून कर्जतकरांना मंत्रमुग्ध केले.

संयोजक केतन गडकरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर निघलो घेऊन दत्ताची पालखी, लळा जिव्हाळा, अंदाज आरश्याचा, प्रथम तुज पाहता, बाइ मी विकत घेतला श्याम, रात्रन दिवस., ब्रम्हा विष्णु., खेळ मांडियेला, मन लागोरे, प्रथम तुला वंदितो, अवघे गरजे पंढरपूर, शोधीसी मानवा, मन मंदिराचा, चला जेजुरीला जाऊ आदी एकापेक्षा एक सरस गीते आनंद कुलकर्णी, मिहीर दुसाने, स्नेहा गोगटे, श्रीरंग वैद्य, आरती भालेराव या गायकांनीसादर केली. त्यांना ढोलकीवर धनंजय बेडेकर, केतन गडकरी, तबल्यावर कौशिक वांजळे, हार्मोनियमवर सुयोग ओक, ताल वाद्यावर संतोष माडगूळकर, उज्वल शिंदे यांनी साथ संगत दिली. संगीत जितेंद्र वझे यांनी दिले. सूत्रसंचालन प्रसिध्द अभिनेत्री जुई गडकरी यांनी केले. कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाली येथे राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगणार

**पाली : प्रतिनिधी**

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने बुधवार दि .१८ डिसेंबर २०२४ रोजी राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे बारावे वर्ष असुन या एकांकिका स्पर्धेचे उदघाटन सिने नाट्य अभिनेता वैभव मांगले यांच्या हस्ते होणार आहे.

माणसातील माणुसकी आपुलकीने जपणारे व्यासपीठ म्हणून प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानने प्रचंड नावलौकिक मिळवले आहे. महाराष्ट्रातील होतकरू आणि प्रतिभावंत कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या एकांकिका स्पर्धा प्रसंगी सुधागड तालुक्यातील नाट्य मंडळांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

या स्पर्धा ग.बा. वडेर हायस्कुल रंगमंच पाली येथे बुधवार दि .१८ डिसेंबर २०२४ ते मंगळवार दि.२४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सायंकाळी ७ वाजता पार पडणार आहेत. रविवार दि.२२ डिसेंबर २०२४ रोजी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

## बोरघाटात अपघातामध्ये तरुण, तरुणी जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे जुन्या महामार्गावरीला बोर घाटात सायमाळ – मेकॅनिक पॉईंट येथे बाईकचा तिव्र उतारावर अपघात झाला. यामध्ये तरुण – तरुणी जखमी झाले आहेत

तळेगाव पुणे जवळ पॅराग्लायडिंग करून मुंबईकडे परतणाऱ्या बाईकर्स मधील युवतीचा आणि युवकाचा अपघात झाला. मोटर बाईक चे ब्रेक फेल झाल्यामुळे हा अपघात घडल्याचे पोलिसांनी सांगितले या घटनेत ठाणे येथील जिग्ना सोळंकिया गंभीर जखमी झाली असून मोटारसायकल चालक शौकत सलीम गवंडी हा किरकोळ जखमी झाला आहे. त्यांच्यावर खोपोली नगरपालीकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचार करून ठाणे येथे खासगी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## जलशक्ती मंत्रालयाच्या समितीची ग्रामपंचायतींमध्ये भेट

**खोपोली : प्रतिनिधी**

जलशक्ती मंत्रालय केंद्रीय समितीने स्वच्छ भारत मिशन ग्रामीण उपक्रम अंतर्गत खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत तांबाटी ,चार महसुली गावे व ग्रामपंचायत वडवळ या ठिकाणी शनिवार ( दि. १४ ) रोजी भेट दिली.

जल शक्ती मंत्रालयाचे सहसचिव आणि उपक्रम प्रमुख जितेंद्र श्रीवास्तव यांचे मार्गदर्शनाखाली संजय कुमार सिन्हा ,बलदेव भारती,अरम तौहीड, मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग सत्यजित बडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे (ग्रामपंचायत)प्रमोद काळे,गटविकास अधिकारी,पंचायत समिती खालापूर संदिप कराड,आशिष थोरात व



राज्यस्तरीय समन्वयक सुजाता सामंत या समितीने प्रथम तांबाटी ग्रामपंचायत येथे भेट दिली.

ग्रामपंचायतीची घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन पाहणी करण्यात आली.सार्वजनिक शोष खड्डे, सार्वजनिक लिचपिट, सार्वजनिक कंपोस्ट पीट तसेच गांडूळ खत प्रकल्प बाबत पाहणी करून मार्गदर्शन केले. शाळा, अंगणवाडी, गावस्तरीय कचरा व्यवस्थापन बाबत कुटुंबाना भेट देऊन समितीने मार्गदर्शन केले.

सदर ग्रामपंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती अधिकारी ग्रामपंचायत तांबाटी प्रशांत कदम व वडवळ ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद पाटील यांनी दिला. तांबाटी ग्रामपंचायत सरपंच अविनाश आमले ,उप सरपंच शितल पाटील , ग्रामपंचायत सदस्य हरीभाऊ जाधव,सुगंधा जाधव,अस्मिता कदम,अरुणा सावंत,संतोष दळवी ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. यावेळी समितीने ग्रामपंचायत मध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करून भविष्यातही अशाच प्रकारे अंमलबजावणी तालुक्यात करण्याबाबत आवाहन केले.

## डॉ. देशमुख महाविद्यालयात जिल्हास्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या मार्गदर्शक तत्त्वांनाअनुसरुन मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर संपन्न झाले.



या शिबिरात रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील निवडक ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीराचे उद्घाटन कोकण एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ संचालक ॲड. हेमंत गांगल यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी भूषविले. उद्घटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल,प्रा.अनंत थोरात व प्रा. सुकुमार पाटील उपस्थीत होते.

या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीराचा मुख्य उद्देश सहभागी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे पुर्ण ज्ञान देणे, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसीत करणे व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे असल्याने या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीरात सहाभगी विद्यार्थ्यांसाठी चर्चा सत्र, निबंध स्पर्धा, भितीपत्रक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीरात राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश, ध्येय व इतिहास, राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमित व निवासी उपक्रम, संवाद कौशल्य, सामुदायिक कार्यातील सामजिक समस्या, राष्ट्रीय सेवा योजना व्यवस्थापन व संधी, व्यक्तिमत्व विकास, ग्रामीण विकासातील युवकांची भूमिका, कौशल्य विकास प्रशिक्षण, वेळेचे व्यवस्थापन, अहवाल लेखन व संपादन कौशल्य आदी विषयावर प्रबोधन सत्र झाली. या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीराचा समारोप महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लिलाधर थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. समारोप प्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

या जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीरासाठी मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रा.सुशील शिंदे, तसेच मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.रमेश देवकर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

हे जिल्हा स्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर यशस्वी करण्यासाठी जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल, विभागीय समन्वयक, रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रमअधिकारी, या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांनी अखंड मेहनत घेतली.

## आमदार गोगावलेंना मंत्रीपद मिळाल्याने माणगावात शिवसेनेतर्फे जल्लोष साजरा

**माणगांव : प्रतिनिधी**

महाड, पोलादपूर व माणगांवचे आमदार भरत गोगावले यांनी मंत्री पदाची शपथ घेताच माणगांव येथे उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला

महाराष्ट्र राज्यात महायुतीचे सरकार स्थापनेवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा शपथविधी सोहळा पार पडला. उर्वरित मंत्र्यांचा शपथविधी सोहळा दि. १५ डिसेंबर रोजी नागपूर येथे पार पडला.

यावेळी महाड, पोलादपूर, माणगांवचे आमदार भरत गोगावले यांनी सुद्धा मंत्री पदाची शपथ घेतल्याने माणगांव येथे उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना प्रवक्ते अँड. राजीव साबळे, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, संघटक ॲड. सुशिल दसवते, शहरप्रमुख सुनिल पवार, नगरसेवक दिनेश रातवडकर, सचिन बोंबले, राजेश मेहता, खरवली सरपंच संतोष खडतर, विरेश येरूणकर, शिरसाड सरपंच प्रमोद खेतम, युवासेना शहरप्रमुख सिद्धेश पिंगळे, युवासेना विभागप्रमुख सचिन मोरे, युवासेना खरवली विभागप्रमुख सुरज सांगले आदी शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# चोरढे शाळा, वळके हायस्कूल व इतर शाळांची पाहणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नवभारतसाक्षरता अभियान अंतर्गत चोरढे मराठी शाळा, वळके हायस्कूल व इतर शाळांची पाहणी योजना सरक उपसंचालक पुणे यांनी मुरुड गटास भेट देउन केली .

महाराष्ट्र राज्यात नवभारत साक्षरता अभियान हा कार्यक्रम अतिशय उत्साहात व मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. नवभारतसाक्षरता अभियान अंतर्गत असाक्षर व्यक्तींची पाहणी करणे, स्वयंसेवकांची माहिती घेणे, शालेय माहिती तपासणे, शालेय विविध उपक्रमांची पाहणी करणे आदी बाबींबाबत उपसंचालक पुणे योजना भाऊसाहेब सरक व महेंद्र बागडे यांनी मुरुड तालुक्यास भेट दिली. मुरुड




◆ उपसंचालकांची मुरुड गटास भेट

यावेळी चोरढे मराठी शाळा, वळके हायस्कूल व इतर शाळांची त्यांनी पाहणी केली.पाहणी मध्ये असाक्षर उपक्रमांतर्गत असाक्षर व्यक्तींची हजेरी, त्यांचा उल्हास, पटावरील नोंदणी, टॅग केलेले असाक्षर, त्यांच्यासाठी नेमलेले स्वयंसेवक, स्वयंसेवक सोबत चालू असलेले वर्ग, शालेय रेकॉर्ड, स्वयंसेवकांची हजेरी, स्वयंसेवकांसोबत हितगुज, वर्ग चालू असलेले फोटो, असाक्षर व स्वयंसेवक यांचे व्हिडिओ, शाळा व्यवस्थापन कमिटी अहवाल, शिष्यवृत्ती वर्ग, विद्यार्थ्यांचे पथनाट्य, आढावा बैठक संख्या,जनजागृती प्रचार यासाठी राबवलेले उपक्रम, असाक्षर वाचन साहित्य, असाक्षरांच्या शाब्दिक नोंदी इत्यादी बाबी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, विस्तार अधिकारी साधन व्यक्ती, केंद्रप्रमुख, चोरढे शिक्षक वृंद, वळके हायस्कूल शिक्षक वृंद यांचे कौतुक केले. नवभारत उपक्रम मुरुड गटात अतिशय चांगल्या प्रकारे राबविला जात असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

चोरढे मराठी शाळेत विद्यार्थ्यांसाठी राबवलेले विविध उपक्रम पाहून त्यांनी विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षीस दिले. भेटीच्या वेळीतालुका गटशिक्षणाधिकारी श्री सुनील गवळी, साधन व्यक्ती पुकळे, चेतन पाटील, दत्ता सातामकर, केंद्रप्रमुख कवळे, संदीप पाटील,मुख्याध्यापक संगीता भगत, शिक्षक वृंद राजेंद्र नाईक, विजय जाधव, प्रतिभा वर्तक आदी शिक्षक उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे–पाली खुर्द, पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक सुलोचना मोहन कल्याणकर व इतर २ यांचेकडुन सदर मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–पाली खुर्द, ता.पनवेल,जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| ८ | २ | १–२९–८०<br>पो. ख. ०–०४–८०<br>**एकुण १–३४–६०** | १२.३१ |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क–हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकतीमध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन २१ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल

दिनांक : १६/१२/२०२४

**प्रसाद वामन कोंडे देशमुख**
**ॲडव्होकेट – पनवेल**

पत्ता : अे/४, जय नगर सोसायटी,किनारा सोसायटी समोर, ५२ बंगलो, कोर्ट रोड, जुने पनवेल, ता.पनवेल, जिल्हा रायगड– ४१०२०६.

## निवडक



### उरणमध्ये रक्तदान शिबिर

**उरण :** ओएनजीसी उरण प्लांट पुरस्कृत आणि ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती व ओएनजीसी (डब्ल्यूओयु) कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१३) ओएनजीसी द्रोणागिरी भवन, उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समूह महाव्यवस्थापक व सयंत्र व्यवस्थापक डि.के.त्रिवेदी, मुख्य महाव्यवस्थापक (उत्पादन) आधारभूत सेवा संदीप कुमार चांद, महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन भावना आठवले मैडम व ओएनजीसी (डब्ल्यू. ओ.यु.) कर्मचारी संघटना, उरण उपाध्यक्ष मनोहर थळी व सचिव सर्व सद्श्य यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

### ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन

**नवी मुंबई :** नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक संघाचा ३३वा वर्धापन दिन सोहळा गुरुवारी (दि.१२) संघाच्या श्री गणेश सभागृहात मोठ्या उत्साहाने आणि आनंदी वातावरणात झाला. नवी मुंबई महापालिकेचे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष फेस्कॉमचे डॉ. अण्णासाहेब टेकाळे होते. अध्यक्ष दि.ना. चापके, फेस्कॉमचे माजी अध्यक्ष अरुण रोडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर, सचिव दीपक दिघे, आर्थिक सल्लागार विकास साठे, रुग्ण सेवा केंद्राचे अध्यक्ष रणजीत दीक्षित, उपाध्यक्ष प्रभाकरराव गुमास्ते, नंदलाल बॅनर्जी, व्ही. के. बदाने आदी उपस्थित होते.

### स्वामी समर्थ मंदिरामध्ये महाप्रसाद

**नवी मुंबई :** हिंदू धर्मात मार्गशीर्ष महिन्याला विशेष महत्त्व असून महिन्यात श्री दत्ताचा जन्म झाला. याच अनुषंगाने



बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या वतीने श्री दत्त जयंतीनिमित्त जुईनगर येथील भक्तगणासाठी श्री स्वामी समर्थ मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत सुहासिनी नायडू, संतोष सुतार, राजू माढरे, मयूर कदम तसेच असंख्य भाविक उपस्थित होते.

# ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणाला गती

## महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण महिलांच्या कौशल्याला प्रोत्साहन देत, त्यांच्या व्यवसायांना चालना देणाऱ्या उमेद अभियानाच्या महालक्ष्मी सरस २०२४ प्रदर्शन व विक्रीचे भव्य उद्घाटन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रूचेश जयवंशी यांच्या हस्ते मोठ्या आनंदात व उत्साहात पार पडले.



सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई याठिकाणी भरवण्यात आलेल्या या प्रदर्शनात घे भरारी - मला पंख मिळाले या कार्यक्रमात सहभागी उमेद अभियानाच्या महिलांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली. या उद्घाटन सोहळ्यावेळी उमेद अभियानचे अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत, अवर सचिव धनवंत माळी, मंजिरी टकले तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी म्हणाले की, ग्रामीण महिलांच्या व्यवसायाला अधिक व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महालक्ष्मी सरस हे एक उत्तम व्यासपीठ ठरले आहे. ग्रामीण महिला उद्योजकांच्या उत्पादनांना चालना मिळावी, त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा आधार मिळावा, यासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरेल. नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देऊन ग्रामीण महिलांना पाठिंबा द्यावा, असे अवाहान ही जयवंशी यांनी केले.

या प्रदर्शनात ४०० पेक्षा अधिक स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये हातमाग, कलाकुसर, हस्तकला, साड्या, कपडे, मसाले, सजावटीच्या वस्तू, तसेच विविध गृहपयोगी वस्तूंचा समावेश आहे. तसेच, महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या अस्सल खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी ७० भव्य स्टॉल्सचे फूड कोर्ट उभारण्यात आले आहे.

या प्रदर्शनात ग्रामीण महिलांनी आपल्या कौशल्याने साकारलेल्या उत्पादनांचा विशेष ठसा उमटवला आहे. नवी मुंबईतील नागरिकांना या संधीचा लाभ घेता येणार आहे. या प्रदर्शनाला महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील महिलांनी आपल्या उत्पादनांसह सहभाग घेतला आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेट द्यावी आणि ग्रामीण महिलांच्या यशाला प्रोत्साहन द्यावे.

**ग्रामीण संस्कृतीचा अनुभव**

महालक्ष्मी सरस २०२४ हे प्रदर्शन फक्त विक्रीसाठी नाही तर ग्रामीण संस्कृतीचा आणि कलेचा अनुभव घेण्यासाठी एक पर्वणी आहे. संपूर्ण वातानुकूलित व्यवस्थेमुळे खरेदीसाठी अतिशय सुखद वातावरण आहे.

# रस्त्यासह फुटपाथवर अतिक्रमण

## कारवाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चार ही प्रभागातील रस्त्यावर तसेच फुटपाथवर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने कारवाई करण्याचे आदेश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेले आहेत, मात्र ड प्रभाग अतिक्रमण विरोधी पथकावडून नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरात कारवाई झाली पाहिजे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनीही नागरिकांनी केलेल्या या मागणीची दखल घेत आयुक्तांकडे यासंदर्भात पत्रव्यवहार केला आहे.

नवीन पनवेल रेल्वे स्थानक ते सीकेटी शाळा रस्त्यावर हातगाड्यांमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. असे असताना महापालिका अतिक्रमण विभागाकडून हातगाड्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. काही वेळा अतिक्रमण विभागाची गाडी येणार असेल तर या हातगाड्यावाल्यांना आधीच फोन येतात. यामुळे येथील हातगाडीवाले गल्लीत जाऊन लपतात.




रेल्वे स्थानक परिसरात बेकायदेशीर मंगलमुर्ती मार्केट येथे खाद्यपदार्थाचे स्टॉल फुटपाथवर वाढत आहेत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. परिणामी, येथे अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे तसेच बेकायदेशीर खाऊगल्लीमुळे दररोज घाणपाणी आणि कचरा रस्त्यावर, फुटपाथ तसेच गटारामध्ये टाकला जात असल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. म्हणून अवैध व धोकादायक पद्धतीने होणारे व्यवसाय बंद करण्यात यावे, अशी मागणी सातत्याने होत आहे.

# पोलीस प्रशासनातर्फे मानवी हक्काबाबत जनजागृती

**उरण : बातमीदार**

न्हावा शेवा पोलीस ठाणे हद्दीतील तुकाराम हरी वाजेकर येथे उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थी/विद्यार्थिनी व शिक्षकांना यांना मानवी हक्क दिनानिमित्त समाजातील तळागाळातील जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहिती होणे व त्याबाबत जनजागृती करिता पोलीस प्रशासनातर्फे कार्यक्रम साजरा करण्यात आला.



या वेळी म.स.पो.नी मोनाली चौधरी. (गुन्हे), म.पो.उप निरी. अश्विनी कांबळे यांनी मानवी हक्काबाबत माहिती दिली.मानवाचे हक्क, पोलीस दलाची माहिती त्याचप्रमाणे सायबर सुरक्षा व गुन्हे प्रतिबंध, व्यसन मुक्ती व अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक व प्रतिबंधक उपाय, जेष्ठ नागरिक सुरक्षा व काळजी, मुली, महिला व बालकाची सुरक्षा, महिलांच्या विरोधातील घटना आदी संदर्भात पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

नवी मुंबई पोलीस व्हॉट्सअॅप चॅनेले फॉलो करण्यास सांगितले व नागरिकांचे पोलिस मदतीसाठी डायल ११२ व साइबर फ्रॉड हेल्पलाईन १९३० क्रमांकाची माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकामध्ये करावा. यांसारख्या विषयांवर पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती दिली

या वेळी प्राचार्य मनोहर म्हात्रे, ज्यु कॉलेज प्रमुख वैजनाथ कुटे, उपशिक्षिका दर्शना माळी तसेच ७० ते ८० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

# ऑर्केस्ट्रा बारविरोधातील स्वाक्षरी मोहिमेला प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा-पामबीच येथील सेक्टर १७ मध्ये येऊ घातलेल्या ऑर्केस्ट्रा बारच्या (डान्स बार) विरोधातील स्वाक्षरी मोहिमेत स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिकांनी पोलीस आयुक्तालयाकडे हरकती पत्र दाखल करीत डान्स बारच्या विरोधातील आपला तीव्र विरोध दर्शवीला.





सानपाडा -पामबीच प्लॉट नंबर ९ सेक्टर १७ येथील दि अफेअर्स या इमारतीतील प्रस्तावित मे. हौसा रेस्टॉरंटमध्ये मद्यपान (बार) व मनोरंजन ऑर्केस्ट्रा (डान्स बार) आल्यास या परिसरात घडणाऱ्या असामाजिक कृत्यांविरोधात स्थानिक माजी नगरसेविका रुपाली भगत व वैजयंती भगत यांनी येथील प्रभागातील नागरिकांसह नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात परवाना शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्याकडे हरकती पत्राचे निवेदन सादर केले होते.

रविवारी पहाटे ७ ते सकाळी १० वाजेपर्यंत माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व युवा नेते निशांत करसन भगत यांच्या उपस्थितीत या प्रास्तावित ऑर्केस्ट्रा (डान्स बार) बारच्या विरोधात सानपाडा-पामबीच येथील गुनीना मैदानाजवळ स्वाक्षरी मोहिम घेण्यात आली.

या स्वाक्षरी मोहिमेला प्रचंड प्रतिसाद देत याच परिसरातील मोठया संख्येने महिला, पुरुष, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिकांनी, खेळाडूंनी आणि शालेय विद्यार्थी मुले यांनी या ऑर्केस्ट्रा (डान्स) बार ला विरोध दर्शविणारी आपले हरकत पत्रे सादर केली व या ऑर्केस्ट्रा (डान्स) बार विरोधातील लढ्यात स्वाक्षरी द्वारे आपला सहभाग नोंदविला.

या वेळी पोलीस प्रशासनाकडे जमा होणाऱ्या आमच्या हरकतींची दखल घेऊन प्रस्तावित डान्स बारला परवाने देऊ नये तसेच कायद्याचे उल्लंघन करून देण्यात आलेले मद्यपान परवाना हादेखील रद्द करावा, अशी मागणी झाली.

## मटारला मागणी

**पनवेल : वार्ताहर**

एकीकडे बोचर्या थंडीची चाहूल लागली की बाजारातही सगळीकडे टपोरे दाणे भरलेले हिरवे मटार नि लालचुटूक गाजरे नजरेस पडतात. मग आपसूक मटार पुलाव आणि गाजर हलव्याचे बेत ठरतात. सध्या पनवेल परिसरातील घाऊक आणि किरकोळ बाजारात हिरवा वाटाणा मोठ्या प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे वर्षभर गगनाला भिडलेले दरही निम्म्यावर आले आहेत.

घाऊक तसेच किरकोळ बाजारात गगनाला भिडलेल्या वाटाण्याचा नोव्हेंबर अखेरीस स्वस्ताईचा हंगाम सुरू होतो. मुंबई कृषी उत्पन्न बाजारात हिरव्या वाटाण्याचा हंगाम सुरू झाला असून आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे प्रतिकिलो शंभरी पार केलेल्या हिरव्या वाटाण्याचे दर निम्यावर उतरले आहेत. मागील आठवड्यात घाऊक बाजारात प्रतिकिलो १००-१२० रुपयांवरून उपलब्ध असलेला वाटाणा आता ६०-७० रुपयांवर विक्री होत आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारातही वाटाणा आवाक्यात आहे.

# बेलापूरमधील विकासकामांचा आमदार मंदा म्हात्रेंकडून आढावा

## मनपा अभियंता व अधिकाऱ्यांसोबत बैठक



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका मुख्यालयात बेलापूर मतदार संघातील विविध प्रश्न आणि विकास कामांचा आढावा घेण्यासाठी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे आणि मनपा शहर अभियंता शिरीष आर धवाद आणि अधिकारी यांच्यात आढावा बैठक झाली.

बैठकीत आमदार निधीअंतर्गत प्रलंबित असलेल्या विकास कामांचा आढावा घेण्यात येऊन कामाबद्दल सकारात्मकता दाखवत कामे लवकरात लवकर होतील, असे शहर अभियंता आरदवाद यांनी आश्वाशीत केले.

बैठकीमध्ये बेलापूर मतदार संघातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. अनधिकृत फेरीवाले, आरोग्य सुविधा, शिक्षण, पाणी टंचाई, अतिक्रमण, डेब्रिज, ज्येष्ठ नागरिकांकरिता गार्डन, डम्पिंग ग्राउंड, तुर्भे बाल माता रुग्णालयास मंजुरी व तुर्भे वार्ड क्रं ७३ डॉ. आंबेडकर नगर व गणेश नगर सुरळीत पाणीपुरवठा व्हावा व इतर अशा अनेक विविध प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केले या सर्व प्रश्नांवर शहर अभियंता यांनी सकारात्मकता दाखवत प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक राजू शिंदे, नवी मुंबई व्यापारीसंघ अध्यक्ष प्रमोद जोशी, विकास सोरटे, दत्ता घंगाळे, ज्योती पाटील, राजू तिकोने, सुरेश अहिवळे, जयवंत तांडेल, मंगेश चव्हाण, मुकुंद विश्वासराव, प्रवीण भगत, प्रताप भोसकर, राजेश पाटील, ज्ञानेश्वर कोळी, मिलिंद भोईर, अजय भोईर, राहुल मोरे, प्रवीण चिकणे, सुवर्णा चिकणे तसेच सबंधित विभागाचे उपायुक्त, विभागीय सहाय्यक आयुक्त व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे निवासी शिबिर

## एनएसएस युनिटचा नेरे शांतिवन येथे उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय योजना विभागातर्फे (एनएसएस)शांतीवन नेरे येथे आयोजित केलेल्या सात दिवसीय रहिवासी शिबिराचे उद्घाटन रविवारी (दि.१५) सायंकाळी ४ वाजता करण्यात आले.



या उद्घाटन सोहळ्यासाठी संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे तसेच चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे तसेच दोन्ही महाविद्यालयातील वेगवेगळ्या शाखांचे विभाग प्रमुख तसेच शांतीवन कुष्ठरोगी समिती नेरे येथील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी पनवेलचे नायब तहसीलदार विनोद लचके व निवासी तहसीलदार संभाजी शेलार यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल लिटरसी बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

या सात दिवसीय रहिवाशी शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत त्यामध्ये स्वच्छता रॅली, श्रमदान, वेगवेगळे बौद्धिक सत्रे यांचा समावेश आहे. या सात दिवसीय निवासी शिबिराचा राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणार आहे तसेच एक राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणून राष्ट्र उभारणीसाठी असणाऱ्या जबाबदाऱ्या ज्ञात होणार आहेत. या वेळी चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा अहवाल सादर केला.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी या सात दिवशीय निवासी शिबिराचे आयोजन केल्याबद्दल दोन्ही महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी सर्वांचे आभार मानले.

# शास्त्रीय संगीत, अभंगवाणीचा कार्यक्रम रंगला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री नवनाथ सेवा मंडळ तळोजे मजकूर योगीनगर धोंडली यांच्या वतीने श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवानिमित्त श्रीस्वामी समर्थ मठ मंदिरात शास्त्रीय व अभंगवाणीचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात झाला.





या वेळी आसाम येथील गायिका श्रुती बुजरबुरुहा यांनी राग दुर्गामध्ये बडा खयाल व छोटा खयाल घेऊन 'श्रीराम चंद्रकृपालु' तसेच 'अवघे गर्जे पंढरपूर' हे दोन अभंग सादर करून श्रोत्यांची दाद मिळवली. त्यांनतर रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांनी राग खमाज तसेच राग देश मधील द्रुत बंदिशी सादर करून भजन परंपरा कायम राखून 'रूप पाहता लोचनी आणि 'स्वामी कृपा कधी करणार' हे भैरवीतील भजन सादर करत श्रोत्यांची वाहवा मिळवून त्यांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला पखवाजवर अॅड्. सूरज गोंधळी, तबला किशोर पांडे, हार्मोनियम तसेच टाळ वरती मंदार दीक्षित व गुरुदास कामत यांनी उत्तम साथ केली. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवनाथ भाग्यवंत यांनी केले.

कार्यक्रमाला एमआयडीसीचे कार्यकारी अधिकारी सुहास कुंभार, तळोजे मजकूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संतोष पाटील, अशोक पाटील, गायक ओम बोंगाणे, वैभव कडू, डॉ. प्रताप पाटील, विनोद तोडकर, अक्षय चौधरी, वैभव चौधरी, गायिका उषा पाटील, विलास खानावकर, आयोजक कैवारी पाटील आदी उपस्थित होते.

# माणगावच्या सैनिक विश्रामगृहाला अखेरची घरघर

## झाडाझुडपांचा विळखा, दरवाजे-खिडक्या तुटलेल्या, संरक्षक भिंतीचीही नासधूस

**माणगाव : प्रतिनिधी**

आजी आणि माजी सैनिकांच्या माणगाव येथील सैनिक विश्राम गृहाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सैनिकांना आधार देणारे विश्रामगृह भूत बंगला बनला आहे. त्यामुळे ह्या डाक बंगल्याला अखेरची घरघर लागली आहे. शासनाने याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून सैनिकांची अवहेलना सुरू ठेवली आहे.

ज्यांनी देशाच्या रक्षणासाठी बलिदान दिले, छातीवर बंदूकीच्या गोळ्या झेलल्या, ऊन, वारा, पाऊस आणि थंडी यांची तमा न बाळगता शहीद झाले, देशासाठी हुतात्मा झाले त्या सैनिकांसाठी असलेल्या विश्रामगृहाला झाडा झुडपांनी विळखा घातल्याने त्याची पडझड झाली आहे. सर्वत्र गवत आणि वेलींचे साम्राज्य पसरले आहे. दरवाजे, खिडक्या, तावदाने तुटलेल्या अवस्थेत आहेत. छप्पर उडालेले आहे. कौले उडून फुटलेली आहेत. संपूर्ण इमारत मोडकळीस आलेली आहे. लोखंडी



प्रवेशद्वार गंजून मोडकळीस आले आहे. संरक्षक भिंतींचीही नासधूस झाली आहे.

पाच वर्षांपूर्वी या विश्राम गृहाची तात्पुरती डागडूजी करण्यात आली होती. तत्कालीन मंत्र्यांनी अनेक वेळा हे विश्रामगृह बांधण्यासाठी प्रयत्न केला आणि निधीही उपलब्ध करून दिला होता. परंतु अद्यापही या विश्रामगृहाला विळखा घालणारे एकही पान हललेले नाही. शासनाने हे विश्राम गृह बांधण्यासाठी कोणत्याही प्रकारची हालचाल केलेली दिसत नाही. त्यामुळे सैनिकांची भीक नको पण कुत्रा आवर अशी अवस्था झाली आहे.

माणगाव मधिल शासकीय सैनिक विश्राम गृह, पोलिस ठाणे, व्हिक्टोरिया क्रॉस पदक विजेते वीर यशवंतराव घाडगे स्मारक आणि काळ नदीवरील पूल या वास्तू ऐतिहासिक ठेवा म्हणून सुरक्षित राहण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. या सर्व वास्तू १८७१ ते १८९१ च्या काळात इंग्रजांनी बांधलेल्या आहेत. या चार वास्तूंपैकी केवळ याच सैनिक विश्राम गृहाची दुरवस्था झाली असून ते कालांतराने नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

पंचवीस वर्षांपूर्वी याच विश्राम गृहात सैनिक आणि पोलीस भरती होत असे. सैनिक कॅन्टीन सुरू होते. त्यामध्ये स्वस्त वस्तू मिळत असत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४७ पासून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या ऐतिहासिक विश्राम गृहात बळ देण्याचे काम सुरू झाले होते. आता या ऐतिहासिक वारशाचे भूत बंगल्यात रुपांतर झाले असल्याने माणगाव तालुक्यातील सैनिकांनी दिलेले बलिदान आणि पत्करलेले हुतात्म्य व्यर्थ गेले आहे असे एका माजी सैनिकांनी अश्रू ढाळत सांगितले.

दरवर्षी ९ जानेवारी रोजी आजी आणि माजी सैनिकांचा मेळावा वीर यशवंतराव घाडगे जयंती निमित्त निमित्ताने होत असतो. त्यावेळी मोठमोठे पुढारी, मंत्री, खासदार, आमदार, उच्च पदस्थ मिलीट्री अधिकारी आश्वासने आणि वचने देऊन जातात. प्रत्यक्षात काहीच होत नाही हे वास्तव आहे.

विश्रामगृहाचे काम होण्यासाठी सैनिक संघटनेने निवेदने दिली मात्र आतापर्यंत काहीच झालेले नाही. बाजूला सरकारी अधिकारी यांचे शासकीय बंगले आणि इमले उभारण्यात येत आहेत. मात्र सरकारच्या तिजोरीत सैनिकांच्या कल्याणकारी वास्तूसाठी एक छदाम नसावा यांचे आश्चर्य आणि नवल आहे. सैनिकांची अशी अवहेलना कधीही आणि कुठेही झालेली नसेल असेही माजी सैनिकांनी सांगितले. यावर कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

# महाडमध्ये सहलीसाठी आली अन् प्रियकरासोबत पळाली!

## अपहरणाचा गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातील जामनेरमधून रायगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या शैक्षणिक सहलीमधील एक विद्यार्थिनी प्रियकराबरोबर पळून जाण्याचा धक्कादायक प्रकार महाडमध्ये घडला. त्यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्याच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे या युवक जामनेरहून सहलीच्या बसमागून मोटरसायकलने आला होता.




जामनेरहून आलेल्या सहलीतील विद्यार्थिनी रायगडावरून खाली उतरल्यानंतर परतताना एक विद्यार्थिनी गाडीमध्ये कमी असल्याचे शिक्षकांच्या लक्षात आले. यामुळे शिक्षक घाबरून गेले होते. त्या विद्यार्थिनीने सोबत असलेल्या मैत्रिणींना तुम्ही पुढे व्हा मी मागून येते, असे सांगितले होते. ही माहिती शिक्षकांनी पोलिसांना दिली. यावरून पोलिसांनी शोध घेणे सुरू केले असता येथील खर्डी गावाजवळ ही विद्यार्थिनी एका तरुणाबरोबर दुचाकीवरून गेल्याचे कळले. यावरून पोलिसांनी शोध घेतला असता जामनेरमधील १९ वर्षांच्या प्रियकराबरोबर ही विद्यार्थिनी गेल्याचे स्पष्ट झाले.

हा युवक सहलीच्या बसपाठोपाठ जामनेरहून किल्ले रायगडपर्यंत आला होता. चित्ता दरवाजा येथून विद्यार्थिनीला पुण्याच्या दिशेने जात असताना मोबाईल लोकेशनच्या आधारे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

याबाबत महाड तालुका पोलिसांनी या युवकावर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध पथकाकडून सुरू आहे.

# इंदापूरमध्ये जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुका प्रहार दिव्यांग (अपंग)क्रांती संघनेच्या माध्यमातून तालुक्यातील सर्व दिव्यांग (अपंग) बांधवांचा मेळावा हा शुक्रवार दि.१३ डिसेंबर रोजी मंगेशी मंगल कार्यालय तळाशेत (इंदापूर) येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी कोकण विभाग अध्यक्ष सुरेश मोकल यांनी बोलताना सांगितले की, दिव्यांग हा समाजातील अतिशय दुर्बल घटक असून त्याच्याकडे कोणत्याही कौशल्याचा अभाव नाही, मात्र रायगड जिल्हा परिषदेच्या योजना ज्या राबवल्या जातात त्या काही मंडळींकडून ठरावीक लोकांनाच दिल्या जातात. आमच्या प्रहार संघटनेच्या व्यक्तींना योजनेपासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे या योजनेचे पैसे हे सरसकट दिव्यांग बांधवांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करावे यासाठी आम्ही आम्ही ५० हजार पोस्ट कार्डवर आमची मागणी मांडून ते जिल्हा परिषदेत पाठवून प्रशासनाचे लक्ष वेधणार आहोत.

त्यांनी पुढे सांगितले की रायगड जि. प.च्या ज्या योजना राबवल्या जातात त्या ठरावीक लोकांनाच दिल्या जातात. तेथील कर्मचारी हे त्याच्याच संघटनेच्या लोकांना या योजनेचा लाभ देतात प्रहार संघटनेच्या व्यक्तीना त्या योजने पासून वंचित ठेवले जाते म्हणून आम्ही आता नवीन मागणी करणार आहोत की या योजना बंद करून त्या योजनेचे पैसे हे दिव्यांग बांधवांच्या बँक खात्यामध्ये मध्ये वर्ग करावे. या साठी आम्ही ५० हजार पोस्ट कार्डचे आंदोलन हे कार्डवर लिहून रायगड जिल्हा परिषदेचे पाठवणार आहोत.

यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष सुनिल घनमोडे,रायगड जिल्हा महिला अध्यक्ष रमाताई चोगले,रायगड जिल्हा कार्यध्यक्ष रविंद्र सांगले,माणगांव ता.अध्यक्ष राजेंद्र(अण्णा) पांचाळ,माणगांव ता.महिला अध्यक्षा रेश्मा मोरे,माणगांव ता.कार्याध्यक्ष नरेश साळवी,माणगांव ता.कार्यध्यक्षा सिध्दि शेपुडे,माणगांव ता.उपाध्यक्ष नथुराम शिंगवण,माणगांव ता. उपाध्यक्षा निकीता शिंगवण,माणगांव ता.सचिव विजय बागवे,माणगांव ता.बौध्दजन पंचायत समिती अध्यक्ष रविंद्र मोरे,मराठी उद्योजीका व समाज सेवीका सुवर्णा जाधव तसेच माणगांव तालुका विभागीय कार्यकारणी अध्यक्ष पदाधिकारी संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन नरेश साळवी यांनी केले.

# बंदुकीतून गोळी सुटून महिला पोलीस कर्मचारी जखमी

## दादर सागरी पोलीस ठाण्यातील घटना

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस स्टेशनमध्ये सरकारी शस्त्रे तपासणी व सफाई सुरू असताना अचानक गोळी सुटल्याने महिला पोलीस कर्मचारी नूतन रामचंद्र लाड ह्या जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय पेण नंतर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



सविस्तर घटना अशी की, दादर सागरी पोलीस स्टेशनमध्ये सरकारी शस्त्रे तपासणी व सफाई सुरू असताना अचानक सुटलेली गोळी नूतन लाड यांच्या पायाला घासून गेल्याने त्या जखमी झाल्या. त्यांना लगेच पेण येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र नंतर त्यांना अधिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. सदर घटना घडल्याचे समजताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, दादर सागरी प्रभारी अधिकारी नागेश कदम आदींनी तत्काळ भेट घेऊन जखमी पोलीस कर्मचारी नूतन लाड यांची चौकशी केली.

# राजिप केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धा रंगल्या

## हस्तकला आणि शिल्पकलेत साईराज शेलार अव्वल

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धा २०२४ होडगाव ता.माणगाव येथे बुधवार (दि.११) रोजी झाल्या. या स्पर्धेत खर्डी खुर्द येथील चौथीचा विद्यार्थी.साईराज जयेश शेलार यांने बनवलेल्या गणपतीच्या सुबक मुर्तीचे कौतुक झाले



रायगड जिल्हा परिषद केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचे उद्घाटन बळीराम खाडे , सरपंच ग्रुप ग्रामपंचायत होडगाव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. प्रतिमेचे पूजन सोनाली खाडे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष होडगाव यांच्या हस्ते करण्यात आले. .

यावेळी वैयक्तिक स्पर्धेत बेचकीने (गोफण) नेम धरणे, दोरी उडी मारणे, मातीपासून शिल्प तयार करणे सांघिक नृत्य स्पर्धा, संगीत गायन स्पर्धा, पथनाट्य, मुलींची लंगडी, मुलांसाठी लगोरी अशा स्पर्धा घेण्यात आल्या. वैयक्तिक स्पर्धेमध्ये तेल्याची वाडी, पळसगाव बुद्रुक, होडगाव आदिवासी वाडी, होडगाव, खर्डी खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावले. व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत होडगाव, पळसगाव बुद्रुक, पळसगाव खुर्द आदिवासी वाडी या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावले.

# पळसदरी मठात राजेश कोठारी, सुचिता वांजळे, प्रसाद पाटील यांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

पळसदरीच्या पवित्र श्री स्वामी समर्थ मठात श्री दत्त जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात सातत्याने ज्ञानदान व रक्तदान कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांचा तसेच संगीत भजन करणाऱ्या सुचिता वांजळे व प्रसादबुवा पाटील यांचा सत्कार करण्यात आला. श्री स्वामी समर्थ भक्त मंडळाच्या वतीने त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

राजेश कोठारी यांनी १९८४ पासून 'सुयश क्लासेस'च्या माध्यमातून हजारो गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले आहे आणि महाविद्यालयीन प्रवेशासाठी आर्थिक सहाय्य केले आहे. त्याचबरोबर, १९८८ – ८९ पासून त्यांनी ५०२ रक्तदान शिबिरे यशस्वीरित्या आयोजित केली आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे आजवर ६२,०२१ रक्त बाटल्यांचे संकलन करून हजारो गरजू रुग्णांचे प्राण वाचवले गेले आहेत.

प्रसादबुवा गजानन पाटील आणि सौ. सुचिता तानाजी वांजळे यांनी आपले वडील भजन भूषण गजाननबुवा पाटील यांचे संगीत भजनाचे कार्य सातत्याने सुरू ठेऊन अनेक शिष्यवर्ग तयार करण्याचे काम करीत असल्याबद्दल या दोघा बहिण भावाचा सत्कार श्री स्वामी समर्थ भक्त मंडळाच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात स्वामी समर्थ मठाच्या प्रमुखांनी कोठारी यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, आपण समाजासाठी एक दीपस्तंभ आहात, असे गौरवोद्गार काढले. यावेळी विक्रांत दरेकर, राजू पोतदार, ड. राजेंद्र निगुडकर, अभिजीत दरेकर, प्रभाकर करंजकर, महेंद्र निगुडकर, अशोक शितोळे आदी उपस्थित होते. कोठारी यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना 'माझ्या या कार्याला स्वामी समर्थांचा आशीर्वाद लाभत आहे. समाज सेवेचा हा प्रवास पुढेही अविरत सुरू राहील.' असे नम्रपणे सांगितले. सूत्रसंचालन दिनेश अडावडकर यांनी केले.

दत्त जयंतीच्या पवित्र दिवशी स्वामी समर्थ मठात पार पडलेला हा कार्यक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. श्री स्वामी समर्थ भक्त मंडळाने या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची परंपरा पुढे चालवली आहे.



# माणगावमध्ये सेवानिवृत्त केंद्रप्रमुखांचे स्नेहसंमेलन साजरे

**पेण : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात सेवा केलेल्या केंद्रप्रमुखांचा स्नेहसंमेलन एस.जी. झणझणे गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नरहरी शिंपी, प्रकाश कोकाटे, एल. एस.जंगम, गिरीधर पिंगळे, हरिश्चंद्र पिंगळे, गणेश साळवी, निर्मला धोत्रे मॅडम, ठाकूर मॅडम, आदींसह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.




यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक केंद्रप्रमुखाला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात २०२३ –२०२४ या वर्षासाठी महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन संघटनेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य गौरव पुरस्कारासाठी पेणमधील कृष्णा महादेव वर्तक यांची रायगड जिल्ह्यातून निवड झाली आहे. यावेळी वर्तक यांना प्रमुख अतिथी माजी गटशिक्षणाधिकारी एस.जी. झणझणे यांच्या हस्ते शाळ, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. माणगाव तालुक्यातून सन २००० साली वर्तक याना रायगड जिल्हा आदर्श केंद्रप्रमुख सन्मान मिळाला होता. हभप कृष्णा वर्तक यांचे शैक्षणिक ,सामाजिक, राष्ट्रीय, अध्यात्मिक कार्य उल्लेखनीय आहे. यावेळी अधिकारी वर्गाने शिक्षण क्षेत्रातल्या जुन्या आठवणी व नवीन दिशा, याबाबत विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश वडेकर, नारायण जाधव, सुधाकर पिंगळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण जाधव यांनी केले.

माणगावमध्ये सेवानिवृत्त केंद्रप्रमुखांचे स्नेहसंमेलन संपन्न झाले यावेळी प्रमुख अतिथी एस. जी. झणझण यांच्या हस्ते कृष्णा वर्तक यांचा सत्कार करण्यात आला

# फणसाड अभयारण्य विभागाकडून जळीत रेषा काढण्याचे काम सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

फणसाड अभयारण्य सुमारे ५४ चौरस किलोमिटर क्षेत्रात व्यापित आहे.या अभय अरण्याला रोहा,मुरुड व अलिबाग या तीन तालुक्याचे क्षेत्र लागून अगदी रस्त्याच्या नजिक आहे. त्यामुळे असंख्य लोक प्रवासकरीत असताना एखादी व्यक्ती सिगारेट किंवा विडी ओढताना माचिसची काडी किंवा ओढलेले सिगारेट पूर्ण न विझवता तसेच टाकून जातो.त्यामुळे रस्त्यालगत सुकलेले गवत पेट घेऊन संपूर्ण अरण्यात आग लागू शकते. त्यामुळे जंगल वनसंपदेचे ऱ्हास होतो. असे प्रसंग उद्भवू नये म्हणून दर वर्षी प्रमाणे यंदा सुधा फणसाड अभयारण्य विभागाकडून जळीत रेषा काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

फणसाड अभय अरण्य क्षेत्राचे जे रस्त्यालगत क्षेत्र आहे.त्यामधील निवडक क्षेत्राची निवड करण्यात येते. रस्त्यालगत व जिथे प्रवासी प्रवास करतात तेथे सर्व वन कर्मचारी जातात.रस्त्यालगत असलेले झाडी झुडपे तसेच सुके गवत एकत्र करून जाळतात.तसेच रस्त्यालगत असणारे सुके गवत ठराविक भागातून जाळले जाते.त्यामुळे संपूर्ण जंगल आगी पासून वाचते.त्यामुळे फणसाड दरवर्षी जळीत रेषा काढत असते.

जानेवारी पासून उन्हाची तीव्रता वाढत असते अश्यावेळी सुके गवत जळण्याची प्रक्रिया टाळता येते.फणसाड अभय अरण्य मधील वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आदेश पोकळ. वनरक्षक अरुण पाटील. राजेश खांडेकर. प्रदीप शेळके.वनजूर पतेने व धनावडे यांनी मोठे परिश्रम घेऊन जळीत रेषा काढण्याचे काम चोखपणे बजावले आहे.



# डब्ल्यूपीएल लिलावात भारतीय खेळाडूंचे वर्चस्व!

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)च्या आगामी हंगामापूर्वी रविवारी (दि. १५) मिनी लिलावाचे आयोजन करण्यात आले होते. या लिलावात एकूण १९ खेळाडूंवर बोली लावण्यात आली. लिलावानंतर सर्व संघातील १८ खेळाडूंचे स्क्वॉड पूर्ण झाले आहे. या लिलावात भारतीय खेळाडूंनी वर्चस्व गाजवले.

डब्ल्यूपीएलच्या लिलावात सर्वाधिक पैसा स्टार खेळाडू सिमरन शेखवर खर्च झाला. गुजरात जायंट्सने तिला १.९० कोटी रुपयांमध्ये आपल्या संघात दाखल केले. लिलावात तिच्यापेक्षा महाग कोणीही विकले गेले नाही. सिमरनचा संघात समावेश करण्यासाठी दिल्ली, गुजरातमध्ये स्पर्धा होती, पण शेवटी गुजरातने बाजी मारत तिला




१.९० कोटी रुपयांमध्ये संघात सहभागी करून केले.

विदेशी खेळाडूंमध्ये वेस्ट इंडिजची स्टार खेळाडू डिआंड्रा डॉटिनला सर्वाधिक रक्कम मिळाली आहे. डॉटिनलादेखील गुजरातने खरेदी केले आहे. गुजरातने तिला १.७० कोटी रुपयांमध्ये आपल्या संघात दाखल केले.

**असा झाला लिलाव**

डिआंड्रा डॉटिन गुजरात जायंट्स १.७० कोटी रुपये, नादिन डी क्लर्क मुंबई इंडियन्स ३० लाख रुपये, जी कमलिनी– मुंबई इंडियन्स १.६० कोटी रुपये, सिमरन शेख– गुजरात जायंट्स १.९० कोटी रुपये, नंदिनी कश्यप दिल्ली कॅपिटल्स १० लाख रुपये, प्रेमा रावत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १.२० कोटी रुपये, एन चारनानी– दिल्ली कॅपिटल्स ५५ लाख रुपये, आरुषी गोयल यूपी वॉरियर्स १० लाख रुपये, क्रांती गौर यूपी वॉरियर्स १० लाख रुपये, संस्कृती गुप्ता मुंबई इंडियन्स १० लाख रुपये, जोशिता व्हीजे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १० लाख रुपये, सारा ब्राइस दिल्ली कॅपिटल्स १० लाख रुपये, अलाना किंग यूपी वॉरियर्स ३० लाख रुपये, राघवी बिस्त रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १० लाख रुपये, जागर्वी पवार रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १० लाख रुपये, निक्की प्रसाद दिल्ली कॅपिटल्स १० लाख रुपये, अक्षिता माहेश्वरी मुंबई इंडियन्स २० लाख रुपये, डॅनियल गिब्सन गुजरात जायंट्स ३० लाख रुपये.

# दुसऱ्या दिवसाखेर 'कांगारू' चारशेपार



## भारताविरुद्ध ट्रॅविस हेड आणि स्टिव्ह स्मिथचे शतक

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ब्रिस्बेन येथील गाबा कसोटीच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या अर्ध्या तासांचा खेळ अन् दिवसाअखेरच्या तासभरात जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीत दिसलेली जादू सोडली तर अख्खा दिवस ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅविस हेड आणि स्टिव्ह स्मिथ या जोडीने गाजवला. दोघांनी केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर यजमान संघाने तिसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर संघाच्या धावफलकावर ७ बाद ४०५ धावा लावल्या आहेत.

गाबा कसोटीच्या पहिल्या दिवशी पावसाचा व्यत्यय आल्याने १३.२ षटकांचा सामना होऊ शकला आणि अखेरीस सततच्या पावसाने खेळ रद्द करण्यात आला. दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरू होताच टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाच्या दोन्ही सलामीवीरांना झटपट पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

तिसऱ्या कसोटी सामन्यात एकवेळ ७५ धावांवर ऑस्ट्रेलियाच्या संघाने तीन विकेट्स गमावल्या होत्या. पण त्यानंतर स्मिथ–हेड या जोडीने चौथ्या विकेटसाठी २४१ धावांची दमदार भागीदारी रचली. हेडने सर्वाधिक १५२ धावांची खेळी केली, तर दुसरीकडे स्मिथने १०१ धावांची दमदार खेळी केली. दोघांनाही बुमराहने बाद केले.

या दोघांना बाद करण्यासाठी कोणत्या गोलंदाजाचा कसा वापर करावा, फिल्ड सेटअप कसे करावे? याबाबतीत रोहित शर्मा बॅकफूटवरच दिसला. त्याने हेडचा एक कॅचही सोडला. ऑस्ट्रेलियन शतकवीरांच्या दमदार खेळीमुळे हिटमॅनच्या कॅप्टन्सीवरही प्रश्नचिन्ह उपस्थितीत होत आहे. मिचेल मार्शही बुमराहच्या जाळ्यात फसला.

दिवसाअखेरच्या शेवटच्या सत्रात बुमराहने भेदक मारा करत टीम इंडियाची लाज राखली. या विकेट्स हाती लागल्या नसत्या तर टीम इंडियाची अवस्था बिकट झाल्याचे पहायला मिळाले असते.

ऑस्ट्रेलियन कॅप्टन पॅट कमिन्स याने (२०) एलेक्स कॅरीच्या साथीनं ५७ धावांची भागीदारी केली. कमिन्सच्या रुपात सिराजने या सामन्यात आपली पहिली विकेट घेतली. एलेक्स कॅरी ४७ धावा करून नाबाद परतला असून मिचेल स्टार्कच्या साथीनं त्याने नाबाद २० धावांची भागीदारी रचली आहे.

आता गाबाच्या खेळपट्टीवर तिसऱ्या दिवसाच्या खेळात लवकरात लवकर तीन विकेट्स घेत भारतीय संघ बॅटिंगला येणार की, 'कांगारूं'ची शेपूटही वळवळणार? ते नक्कीच पाहण्याजोगे असेल.

## जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# स्वस्तिक, जॉली, सिद्धार्थ, पार्ले संघ विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वस्तिक क्रीडा मंडळाने मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणीच्या प्रथम श्रेणी पुरुषांत पूर्व विभागात सलग तिसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावले. याच गटाच्या पूर्व विभागात जॉली स्पोर्टस्ने अजिंक्यपद मिळविले. सिद्धार्थ क्रीडा मंडळ, पार्ले स्पोर्टस् हे दोन संघ कुमार गटात अनुक्रमे पूर्व आणि पश्चिम विभागाचे विजेते ठरले.

मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने संयोजन संस्था चारकोप यांच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवली सेक्टर २ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले होते. पूर्व विभाग प्रथम श्रेणीच्या अंतिम सामन्यात स्वस्तिक मंडळाने अमरज्योत संघाचा प्रतिकार २९–२५ असा मोडून काढत हॅट्रीक साधली. स्वस्तिक मंडळाने सुरुवातच झंझावाती करत प्रतिस्पर्ध्यावर दोन लोण देत पूर्वार्धात २३–०६ अशी मोठी आघाडी घेत विजयाचा पाया रचला. उत्तरार्धात मात्र अमरज्योत संघाने लोणची परतफेड करीत सामना रंगतदार अवस्थेत नेला, परंतु स्वस्तिकने संयम राखत चार गुणांनी सामना आपल्याकडे राखला. पूर्वार्धात तुफानी खेळ करणाऱ्या आकाश रूडले, अक्षय बेर्डे यांच्यामुळेच स्वस्तिकला विजेतेपद राखता आले. उत्तरार्धात सुर सापडलेल्या अमरज्योतच्या संकेत मोरेने स्वस्तिकला जेरीस आणले, पण अन्य सहकाऱ्यांची साथ न लाभल्याने अमरज्योत संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

याच गटाच्या पश्चिम विभागात जॉली स्पोर्टस्ने गोकुळवन मित्र मंडळाला ४८–१८ असे सहज लोळवत विजेतेपदाचा मान पटकाविला. पहिल्या डावात जॉलीने धडाकेबाज सुरुवात केली. त्यांनी गोकुळवन संघावर तीन लोण देत व तीन बोनस गुण मिळवित ३१–५ अशी आघाडी घेतली. या धक्क्यातून गोकुळवन संघाला सावरणे जमले नाही. नामदेव इस्वलकर, अभिषेक नर यांच्या चढाई पकडीच्या खेळामुळे मोठा विजय शक्य झाला. गोकुळवनच्या अभिषेक बागले, सुमेध सावंत यांचा खेळ या सामन्यात बहरला नाही.

कुमारांच्या पूर्व विभागात सिद्धार्थ क्रीडा मंडळाने ओवाळी मंडळाचा ३३–११ असा सहज पराभव करीत हे जेतेपद पटकावले. मध्यांतराला १४–०६ अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धार्थ संघाने त्यानंतरदेखील आपल्या खेळाची गती कायम राखत २२ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. नरेश चव्हाण, संकेत यादव, अमित फाटक यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. ओवळीचा अमन तोमर चमकला.

याच गटाच्या पश्चिम विभागाच्या अंतिम सामन्यात पार्ले स्पोर्टस्ने श्री सिद्धिविनायक मंडळाला ४६–२५ असे नमवित जेतेपदाचा चषक आपल्या नावे केला. विश्रांतीला २२–१० अशी आघाडी घेणाऱ्या पार्ले संघाने नंतरच्या खेळातदेखील आपला जोश कायम राखत या विजयाला गवसणी घातली. अभिषेक यादव, ईशांत शिंदे यांच्या सर्वांगसुंदर खेळाला या विजयाचे श्रेय जाते. श्री सिद्धिविनायकचे ओम् कुदळे, चंद्रकांत भोसले बरे खेळले.



**जळगाव : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा ११व्या वर्षी आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा स्पर्धा प्रमुख तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी शुभारंभ झाला. सोबत अन्य मान्यवर.**



# रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला खेळांचा आनंद

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**



**क्रीडा महोत्सव उत्साहात**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने चार सांघिक व ११ वैयक्तिक खेळांमध्ये १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माजी सैनिक एनएसजी कमांडो श्रीराम वांदरे यांच्या हस्ते झाला. क्रीडा ज्योत प्रज्वलित करून विद्यार्थ्यांनी मान्यवरांना मानवंदना दिली. दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात पहिल्या दिवशी कबड्डी, क्रिकेट व खो–खो या सांघिक खेळांच्या स्पर्धा रंगल्या, तर दुसऱ्या व शेवटच्या दिवशी विविध मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या.

क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, मलिका चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष निखात सय्यद, भुवन ग्रामपंचायतीचे सरपंच दीपक जाधव, सामाजिक कार्यकर्ते ॲड. परेश जाधव, पालक व माजी विद्यार्थी आदींच्या उपस्थितीत झाले. या वेळी प्रमुख मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खेळ व खेळांचे महत्व या विषयी मार्गदर्शन केले.

क्रीडा स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण गरधे यांनी व सूत्रसंचालन शिक्षिका नेहा ऐत यांनी केले. मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व क्रीडा विभाग प्रमुख श्रीकृष्ण गरधे, क्रीडा शिक्षक व इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून उत्साहपूर्ण वातावरणात क्रीडा महोत्सव झाला. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख अजित शेडगे यांनी केले. मुख्याध्यापक कदम यांनी दोन्ही कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन उपस्थितांचे आभार मानले.

# वसीम, आमिरनंतर इरफानही निवृत्त

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

टी–२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानकडून खेळलेले इमाद वसीम आणि मोहम्मद आमिर गेल्या दोन दिवसांत निवृत्त झाले आहेत. आता पाकिस्तानचा अजून एक वेगवान गोलंदाज मोहम्मद इरफानही निवृत्ती घेणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सहभागी झाला आहे. गेल्या तीन दिवसांत पाकिस्तानच्या या तीन खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

पाकिस्तानचा सर्वात उंच वेगवान इरफानने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत क्रिकेटला अलविदा केला आहे. या पोस्टमध्ये तो म्हणाला, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. मला माझ्या सहकाऱ्यांचे आणि प्रशिक्षकांचे आभार मानायचे आहेत. तुम्ही दिलेले प्रेम, पाठिंबा आणि अविस्मरणीय आठवणींसाठी धन्यवाद. ज्या खेळाने मला सर्व काही दिले त्याला मी पाठिंबा देत राहीन आणि त्याचा आनंद घेत राहीन.



**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पापडीचा पाडा येथे झालेल्या स्व. नानाशेठ घरत स्मृतिचषक क्रिकेट स्पर्धेला सदिच्छा भेट दिली. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, केशव घरत, विलास घरत, जगदीश घरत, शुभ पाटील उपस्थित होते.**

# स्वच्छ आणि ड्रग्ज फ्री नवी मुंबईसाठी मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबईत कार्यरत असणाऱ्या सर्व शासकीय प्राधिकरणांतील अधिकाऱ्यांनी एकमेकांसोबत सहकार्याची भूमिका ठेवत नवी मुंबई शहर स्वच्छतेत देशात प्रथम आणण्यासाठी व ड्रग्ज फ्री करण्याकरिता मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून नवी मुंबईकरांना जागृतीचा संदेश दिला.

स्वच्छ, सुंदर व ड्रग्ज फ्री नवी मुंबई करण्याकरिता जनजागृती करण्यासाठी या मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई प्रेस क्लबच्या माध्यमातून गुरुवारी सीबीडी येथील राजीव गांधी स्टेडियम येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झालेल्या पोलीस संघाने बाजी मारली, तर महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत सहभागी झालेला एमएमआरडीएचा संघ उपविजेता ठरला आहे.

आपले शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी जर प्रत्येक नागरिकाने उचलली तर निश्चितच नवी मुंबई शहर या देशातील स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक शहर म्हणून लवकरच नावारुपास येईल. स्वच्छतेत जरी हे शहर देशात तिसऱ्या क्रमांकावर असले तरी स्वच्छतेसोबतच हे शहर अमली पदार्थ मुक्त (ड्रग्ज फ्री) व सायबर सेफ्टीच्या अनुषंगानेदेखील देशातील सुरक्षित शहर म्हणून अव्वल क्रमांकावर आणण्याची शपथ या वेळी क्रिकेट स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व अधिकारी–लोकप्रतिनिधी व पत्रकारांनी घेतली.

स्वच्छ नवी मुंबई मिशन व ड्रग्ज फ्री–सायबर सेफ्टी नवी मुंबई शहर करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई प्रेस क्लबतर्फे खेळविण्यात आलेल्या या मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबई पोलीस, नवी मुंबई वाहतूक पोलीस, नवी मुंबई महापालिका, पनवेल महापालिका, आरटीओ (नवी मुंबई व पनवेल), एमएसआरडीसी, एमएमआरडीए, कोकण विभागीय महसूल अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि पत्रकार आदींचे संघ सहभागी झाले होते.

या स्पर्धेस पोलीस सहआयुक्त संजयसिंह येनपुरे, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पउपायुक्त पंकज डहाणे, संजय पाटील, तिरुपती काकडे, रश्मी नांदेडकर, अप्पर जिल्हाधिकारी संजय पालांडे, अमोल यादव, विजय देशमुख, संजय जाधव, एमएसआरडीसीचे नियोजन विभागाचे संचालक जितेंद्र भोपळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरिष आरदवाड, उपायुक्त शरद पवार, किसनराव पलांडे, पनवेल महापालिकेचे उपायुक्त कैलास गावडे, डॉ. बाबासाहेब राजळे, लेखाधिकारी मंगेश गावडे, लेखापरीक्षक निलेश नलावडे व अधिकारीवर्ग उपस्थित होता.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com